(इंग्रजीत टंकलेखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

प्रकाशनयोग्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

फौजदारी अपील अधिकारिता

फौजदारी अपील क्रमांक १९१०/२०१०

बाळू सुदाम खाल्दे व इतर ..... अपीलकर्ते

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य .....उत्तरवादी

न्यायनिर्णय

जे. बी. पारडीवाला, न्यायमूर्ती

१. सदर अपील दोन सिद्धअपराधी व्यक्तींच्या वतीने विशेष परवानगी द्वारा दाखल केले आहे आणि ते मुंबई उच्च न्यायालयाने फौजदारी अपील क्र. ६३७/२००३ मध्ये पारित केलेल्या दिनांक ०२.०३.२००९ चा न्यायनिर्णय व आदेशा विरुध्द दाखल करण्यात आले आहे, ज्याद्वारे उच्च न्यायालयाने वर संदर्भित फौजदारी अपील नामंजूर केले आणि विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे यांनी सत्र प्रकरण क्रं. ३२३/२००१ मध्ये दोन्ही अपीलकर्त्यांना भारतीय दंड संहिता १८६० (संक्षिप्ताकरिता "भादवी") चे कलम ३०२ सह ३४ अन्वये दोषी ठरवून त्यांना जन्मठेपेची शिक्षा आणि प्रत्येकी रू१०००/- इतक्या दंडाची, तसेच दंड न भरल्यास त्यांना अतिरिक्त सहा महिन्याची

सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे, तो दिनांक १२.०३.२००३ रोजी पारित केलेला दोषसिद्धीचा आदेश आणि त्याच्या परिणामी झालेली शिक्षा कायम केले आहेत.

२. या टप्प्यावर हे म्हणणे गैर लागू होणार नाही की, दोन अपीलकर्त्यांसह एकुण चार व्यक्तींच्या विरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ आणि ३२३ सह कलम ३४ अंतर्गत शिक्षायोग्य केलेल्या गुन्ह्याकरिता अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे यांच्या न्यायालयात खटला चालविण्यात आला. यातील अपीलकर्ते हे अनुक्रमे मूळ आरोपी क्र. १ आणि ३ आहेत. मूळ आरोपी अनुक्रमे आरोपी क्रमांक २ व ४ यांना न्यायचौकशी न्यायालयाने दोषमुक्त ठरविले होते.

<u>अभियोग पक्षाचे प्रकरण</u>

३. अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यात तसेच सविस्तररित्या प्रथम खबरी अहवालात व्यक्त केलेले अभियोग पक्षाचे प्रकरण असे आहे की, घटनेच्या दुर्दैवी दिवशी म्हणजे दिनांक ०१.०४.२००१ रोजी रात्री अंदाजे ११.१५ वाजता प्रथम खबर देणारा सरकारी साक्षीदार १ नामे अजगर शेख (नि. ७)हा त्याचा मित्र अब्बास बेग (मयत) याच्याशी गप्पा मारत होता. त्यावेळी यातील अपीलकर्ता क्र. २ इतर काही व्यक्तींसोबत बाजूने जात असताना, मयत अब्बास याने त्यांना हाक मारली. त्या दोघांमध्ये काही शाब्दिक बाचाबाची झाली. काही वेळानंतर यातील अपीलकर्ता क्रं २, यातील अपीलकर्ता क्रं.१ सोबत आणि इतर दोन सहआरोपी ज्यांना न्यायचौकशी न्यायालयाने दोषमुक्त केले होते, ते घटनास्थळी पोहोचले. तिथे मारामारी झाली, ज्यामध्ये प्रथम खबर देणारा सरकारी साक्षीदार १ अजगर शेख यांच्या डोक्यावर कोयता आणि तलवार सारख्या शस्त्रांनी हल्ला करण्यात आला. प्रथम खबर देणारा सरकारी साक्षीदार १ याच्या डोक्यावरील हल्ला हा यातील अपीलकर्ता १ यांनी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रथम खबर देणार यांच्या डोक्याला जखम होऊन रक्तस्राव झाला. त्यानंतर मयत अब्बास बेग यांच्यावर कोयता आणि

तलवारीने जबर हल्ला करण्यात आला. यातील अपीलकर्त्यांच्या हातात कोयता व तलवारी सारखी धोकादायक शस्त्रे होती, असे अभियोग पक्षाचे प्रकरण आहे. मयत अब्बास बेग यांच्या शरीरावर गंभीर जखमा झाल्या होत्या आणि अखेरीस अशा जखमांमुळे त्यांचा मृत्यू झाला.

४. घटनेच्या वेळेपासून अवघ्या तीन तासाच्या आत सरकारी साक्षीदार १ ने ०२.०४.२००२ रोजी पहाटे २ वाजता प्रथम खबरी अहवाल दाखल केला. मयत अब्बास बेग यांना झालेला जखमातून गंभीर रक्तस्त्राव झाल्यामुळे त्यांना सरकारी साक्षीदार ३ नसीर खान यांच्या मालकीच्या रिक्षातून रुग्णालयात नेण्यात आले. रुग्णालयात पोचल्यावर त्यांना मृत घोषित करण्यात आले.

५. सरकारी साक्षीदार १ म्हणजे अजगर शेख यांनी दाखल केलेला प्रथम खबरी अहवाल (निशाणी ८) याप्रमाणे वाचण्यात यावा :

"मी अजगर इब्राहिम शेख, वय २२ वर्षे, धंदा - टर्नर, राहणार ५४ बीपी /२५१ लोहियानगर, झोपडपट्टी, पुणे, मी याद्वारे माझी फिर्याद खालीलप्रमाणे दाखल करीत आहे. मी वर नमूद पत्त्यावर माझी आई, वडील आणि बहिणी सोबत राहतो. मी गेल्या तीन वर्षांपासून अब्दुल वहाब शेख यांच्या मालकीच्या गुरुवार पेठ, पुणे येथील न्यू क्वालिटी इन्स्ट्रुमेंटस या नावाने असलेल्या कारखान्यात काम करत आहे. काल म्हणजे १.४.२००१ रोजी मी सकाळी ९.०० वाजता घरातून कारखान्यामध्ये हजर होण्यासाठी निघालो. मी दिवसभर कारखान्यात काम केले आणि संध्याकाळी ७.०० वाजता परत आलो रात्री ११.१५ वाजता मी जेवण केले आणि त्यानंतर मला पानमसाला घ्यायचा होता म्हणून बाहेर गेलो. जेव्हा मी कुठेतरी श्री साई कार ऑटो कन्सल्टंट नावाच्या दुकानाजवळ पोहोचलो तेव्हा मला माझा मित्र अब्बास बेग (मयत) लोहियानगर, झोपडपट्टी, पुणे येथील रहिवासी हा भेटला. मी माझा मित्र अब्बास सोबत बोलण्यास सुरुवात केली, त्यावेळी आम्ही बोलत होतो त्या ठिकाणाहून संतोष खाल्दे आणि दुसरा मुलगा जात होते. माझा मित्र

अब्बास याने संतोषला पाहिले आणि मला म्हणाला की (हिंदीत), "इतक्या रात्री आई चोडायला कुठे चालला आहेस? तुझा प्लॅन काय आहे? संतोषने उत्तर दिले की, त्याचा प्लान काही नाही आणि तो नैसर्गिक विधीसाठी जात आहे. रात्री ११.४५ वा सुमारास, चार व्यक्ती बाळू खाल्दे , रमेश मोहिते, राजू मोहिते आणि संतोष खाल्दे जमले आणि आमच्याशी बोलू लागले. त्यावेळी बाळू खाल्दे त्याला म्हणाला की, "बाजूला हट". अब्बास बेग बाळू खाल्दे याला म्हणाला की (हिंदित), "त्याच्याशी काय बोलतोस? माझ्याशी बोल." त्यावेळी त्यांना म्हणालो की (हिंदीत), "कशाला लफडा करतोस? त्यावेळी बाळू खाल्दे याने त्याच्या कमरेत लपवलेले कोयत्यासारखे हत्यार काढून माझ्या डोक्यावर प्रहार केला. रमेश मोहीते याने अब्बास बेगला पकडले आणि बाळू खाल्दे याने त्याच्यावर लहान पाते असलेल्या तलवारीने भोसकले. आम्ही ओरडायला लागलो. शेजारी राहणारे फिरोज बाबुमिया शेख त्यांच्या घरातून बाहेर आले आणि राजू मोहिते यांना म्हणाले,"तुम्ही कशासाठी भांडत आहात" संतोष खाल्दे याने फिरोज बाबुमिया यांना शिवीगाळ केली. घटनास्थळी लोक जमा होऊ लागल्यावर चारही हल्लेखोर पळून गेले. अब्बास बेग गंभीर रित्या जखमी झाला आणि खाली पडला त्याला डावा पंजा, मनगट, उजवा हात आणि उजव्या खांद्यावर जखमा झाल्या होत्या आणि त्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. मी अब्बासला जखमी अवस्थेत उचलून जवळच्या चोकडी जवळ नेले. तेवढ्यात त्याच झोपडपट्टीत राहणारा आमच्या ओळखीचा रिक्षाचालक नासीर तिथे आला. मी पोहोचेपर्यंत आणि पोलिसांना बोलवेपर्यंत मी नसीरला अब्बास बेग वर लक्ष ठेवण्यास सांगितले. त्यानुसार मी फिरोज शेख बरोबर लोहियानगर पोलीस ठाण्यात गेलो आणि घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलीस आले आणि त्यांनी अब्बास बेगला तातडीने जवळच्या ससून रुग्णालयात हलवले मात्र अब्बास बेग यांना रुग्णालयात डॉक्टरांनी मृत घोषित केले."

६.	मयत व्यक्तीच्या मृतदेहाचा मरणान्वेषण पंचनामा रुग्णालयातच करण्यात आला. तपासाचा भाग म्हणून गुन्ह्याच्या दृश्याचा पंचनामा करण्यात आला रक्ताचे डाग लागलेले मयत व्यक्तींचे कपडे गोळा करून ते रासायनिक विश्लेषणासाठी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठवण्यात आले. सर्व चारही आरोपींना पोलिसांनी पकडले. सर्व आरोपींचे कपडे गोळा करून न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. मयत व्यक्तीचा मृतदेह शवपरीक्षेसाठी पाठवण्यात आला. यातील अपीलकर्ते पोलिसांच्या कोठडीत असताना त्यांनी स्वच्छेने असे निवेदन केले होते की, त्यांनी ज्या ठिकाणी गुन्ह्याची हत्यारे म्हणजे कोयता आणि तलवार लपवून ठेवली होती ते ठिकाण दाखवू. अखेरीस पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत शोध पंचनामे करण्यात आलें. इतर निरनिराळ्या साक्षीदारांची निवेदने पोलिसांनी नोंदविली.

७.	तपासाअंती विद्वान दंडाधिकारी यांच्या न्यायालयात भादवी कलम ३०२ सह ३४ खाली शिक्षापात्र गुन्ह्यासाठी आरोपपत्र दाखल करण्यात आले. विद्वान दंडाधिकारी यांनी प्रकरण सत्र न्यायालयाकडे सोपविले कारण हा गुन्हा केवळ सत्र न्यायालयाद्वारा न्यायचौकशी योग्य होता.

८.	न्यायाचौकशी न्यायालयाने खालील दोषारोप ठेवला आहे, पहा निशाणी ८. अपीलार्थी विरुद्ध ठेवण्यात आलेल्या दोषारोपांची भाषांतरित आवृत्ती खाली उधृत केली आहे.

> *"१.	की तुम्ही आरोपी क्रं. १ ते ४ दिनांक ०१.०४.२००१ रोजी रात्री ११.४५ वाजण्याच्या दरम्यान किंवा त्या सुमारास प्लॉट क्रं. ५४/बीपी, लोहियानागर, पुणे, श्री साई कार ऑटो कन्सल्टंट नावाच्या दुकानासमोर, तुमचा वैयक्तिक किंवा सामाईक हेतू साध्य करण्यासाठी, हेतुपूर्वक किंवा जाणीवपूर्वक अब्बास सनाउल्ला बेग यांचा खून केला, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला आणि याद्वारे भारतीय दंड संहितेच्या केवळ कलम ३०२ नुसार किंवा*

भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ सह ३४ नुसार शिक्षापत्र गुन्हा केला आहे आणि त्याची माझ्याकडून दखल घेण्यात आली आहे.

<u>आणि</u>

२) की, तुम्ही आरोपी क्र १ ते ४ वरील नमूद दिवशी, तारीख, वेळी आणि ठिकाणी आणि एकाच घडामोडी दरम्यान, तुमचा वैयक्तिक किंवा सामायिक हेतू साध्य करण्यासाठी स्वेच्छेने फिर्यादी अजगर इब्राहिम शेख यांना इजा केली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या केवळ कलम ३२३ नुसार किंवा भारतीय दंड संहितेच्या कलम ३२३ सह ३४ नुसार शिक्षापत्र गुन्हा केला आहे आणि त्याची माझ्याकडून दखल घेण्यात आली आहे.

<u>आणि</u>

३) की तुम्ही आरोपी क्रं. १ ते ४ वर नमूद दिवशी, तारीख वेळी आणि ठिकाणी व एकाच घडामोडींच्या दरम्यान, तुमचा वैयक्तिक किंवा सामायिक हेतू साध्य करण्यासाठी कोयता आणि तलवारी जी हत्यारे गुन्ह्याचे हत्यार म्हणून वापरल्यास, त्या फिर्यादीचा मृत्यू होण्याची शक्यता असते याची जाणीव असताना देखील त्या हत्यारांद्वारे स्वच्छेने फिर्यादी अजगर इब्राहिम शेख यांस इजा केली आणि याद्वारे भारतीय दंड संहितेच्या केवळ कलम ३२४ किंवा भारतीय दंड सहितेच्या कलम ३२४ सह ३४ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला आहे आणि त्याची माझ्याकडून दखल घेण्यात आली आहे.

आणि

४) *की, तुम्ही आरोपी क्र १ ते ४ वर नमूद दिवशी, तारीख, वेळी आणि ठिकाणी आणि एकाच घडांमोडी दरम्यान, तुमचा वैयक्तिक किंवा सामायिक हेतू साध्य करण्यासाठी जाणूनबुजून फिर्यादी अजगर इब्राहिम शेख यांचा अपमान करून त्यायोगे त्यास संरक्षण (? चिथावणी) दिली, अशा चिथावणीमुळे फिर्यादीद्वारा सार्वजनिक शांततेचा भंग होईल या गोष्टीची माहिती किंवा जाणीव असताना देखील तसे करण्यात आले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या केवळ कलम ५०४ नुसार किंवा भारतीय दंड संहितेच्या कलम ५०४ सह ३४ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला आहे आणि त्याची माझ्याकडून दखल घेण्यात आली आहे.*

आणि याद्वारे आपणास निर्देश देण्यात येत आहे कि, उपरोक्त दोषारोपांसाठी माझ्याद्वारे खटला आपल्याविरूद्ध चालविला जाईल."

९. अभियोग पक्षाने त्यांच्या खटल्याच्या पुष्ठ्यर्थ खालील साक्षीदारांचे तोंडी साक्षीपुरावे दाखल केले.

(१) सरकारी साक्षीदार १	असगर शेख	नि. ७
(२) सरकारी साक्षीदार २	फिरोज शेख	नि.९
(३) सरकारी साक्षीदार ३	नसीर खान	नि. १०;
(४) सरकारी साक्षीदार ४	असलम खान	नि. ११
(५) सरकारी साक्षीदार ५	महेश कुमार जैन	नि.१४
(६) सरकारी साक्षीदार ६	सुहास कळसे	नि. १५

(७) सरकारी साक्षीदार ७	डॉक्टर श्रीकांत चांदेकर	नि.१८
(८) सरकारी साक्षीदार ८	मुबारक बेग	नि २१
(९) सरकारी साक्षीदार ९	महेंद्र अरोकडे	नि. २२
(१०) सरकारी साक्षीदार १०	बाबा शेख	नि. ३८

१०. अभियोग पक्षाने पुढीलप्रमाणे लक्षणीय कागदोपत्री साक्षी पुरावे सादर केले आहेत.

(i) मरणान्वेषण पंचनामा

(ii) शव विच्छेदन अहवाल

(iii) घटनास्थळ पंचनामा (गुन्ह्याच्या पंचनाम्याचे दृश्य)

(iv) अटक आणि अंगझडती

(v) फिर्यादीच्या कपड्यांची जप्ती

(vi) मयताच्या कपड्यांची जप्ती

११. अभियोग पक्षाचा तोंडी तसेच कागदोपत्री पुरावा पूर्ण झाल्यानंतर, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (संक्षिप्ततेसाठी फौ.प्र.सं) कलम ३१३ अंतर्गत यातील अपीलकर्त्याचे जबाब नोंदविले गेले ज्यामध्ये यातील अपीलकर्ता यांनी कथन केले आहे की, तक्रार ही खोटी होती. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांच्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अंतर्गत नोंदविलेल्या जबाबात असे नमूद केले आहे की, ते हिंदी एकता मंडळाचे कार्यकर्ते होते. दिनांक ०९/०३/२०२१ रोजी अल्पसंख्यांक समाजातील काही लोकांनी गणेशाच्या मूर्तीस नुकसान पोहोचवल्यामुळे हिंदु आणि मुस्लिमांमध्ये तणाव निर्माण झाला. त्या संदर्भात पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. अशा परिस्थितीत, साक्षीदारांनी त्यांच्याविरुद्ध खोटी साक्ष दिली.

१२.	न्यायचौकशी अंती, विद्वान न्यायचौकशी न्यायाधीश यांनी अपीलकर्त्यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ सह कलम ३४ नुसार दंडनीय अपराधी ठरवले आणि यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे दोघांनाही शिक्षा सुनावली. मूळ आरोपी क्रमांक २ आणि ४ यांना सर्व आरोपांमधून निर्दोष मुक्त करण्याचे आदेश देण्यात आले.

१३.	वर निर्दिष्ट केलेल्या अशा परिस्थितीत, सदर दोन अपीलकर्ते हे प्रस्तुत अपीलासह या न्यायालयासमोर आहेत.

<u>अपीलकर्त्यांच्या वतीने सादर निवेदन</u> -

१४.	अपीलकर्त्यांच्या वतीने उपस्थित विद्वान वकील यांनी जोरदारपणे सादर केले की, उच्च न्यायालय यांनी न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेले न्यायनिर्णय आणि दोषसिद्धीचा आदेश याविरुद्ध या दोन अपीलकर्त्यांनी दाखल केलेले अपील फेटाळण्यात गंभीर चूक केली आहे. विद्वान वकिलांच्या मतानुसार, उच्च न्यायालय हे आकलन करण्यास अपयशी ठरले आहेत की, तथाकथित प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या पुराव्यावर भिस्त ठेवली जाऊ शकत नाही. विद्वान वकिलांच्या मतानुसार, अभिलेखावर असणारा दृश्य पुरावा हा प्रकरण सिद्ध होण्यास बळकटी देत नाही आणि तो विचारात न घेण्याजोगा आहे.

१५.	विद्वान वकिलांनी पुढे असे सादर केले की, प्रथम खबर देणारा स. सा १ म्हणजेच असगर शेख याची उपस्थिती संशयास्पद आहे. कारण, जरी त्याने असा दावा केला आहे की, हल्ला करताना त्याच्या डोक्याला दुखापत झाली तरी त्याने कोणतेही वैद्यकीय उपचार घेतले नव्हते आणि अभिलेखावर असे कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र नाही की, ज्याद्वारे हे सिद्ध होईल की त्याच्या डोक्याला कोणतीही दुखापत झाली आहे. अशा परिस्थितीत, विद्वान वकिलांच्या मते, स. सा १ च्या सांगण्यावरून संपूर्ण प्रथम खबरी अहवाल हा अविश्वासनीय आहे.

१६. विद्वान वकिलांनी पुढे असे सादर केले की, पंच साक्षीदार हे प्रकरणास बळकटी देण्यास अपयशी ठरल्यामुळे किंवा त्याऐवजी पंचनाम्याचा मजकूर सिद्ध करण्यास अपयशी ठरल्याने भारतीय पुरावा कायदा, १८७२ (संक्षिप्ततेसाठी '१८७२ चा कायदा') च्या कलम २७ अंतर्गत हस्तगत केलेल्या शस्त्रांवर देखील भिस्त ठेवली जाऊ शकत नव्हती.

१७. शेवटी, अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी जोरदारपणे असे सादर केले की, जरी अभियोग पक्षाचे संपूर्ण प्रकरण खरे आहे असे मानले तरी, जास्तीत जास्त प्रस्तुत प्रकरण हे खुनाच्या प्रकरणामध्ये न मोडता सदोष मनुष्यवधाच्या प्रकरणांतर्गत असेल. विद्वान वकिलांच्या मतानुसार, प्रस्तुत प्रकरण हे भारतीय दंड संहितेच्या कलम ३०० च्या अपवाद ४ च्या कक्षेत येते.

१८. वर संदर्भित केलेल्या अशा परिस्थितीत, विद्वान वकिलांनी अशी विनंती केली की, त्याने दाखल केलेल्या प्रकरणामध्ये गुणवत्ता असल्याने सदरचे अपील मंजूर करण्यात यावे आणि अपीलकर्त्यांना सर्व आरोपांमधून निर्दोष मुक्तता केले जावे. पर्यायाने, त्यांनी अशी प्रार्थना केली की, दोषारोपामध्ये, भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ मधील १ वरून भारतीय दंड संहितेच्या कलम ३०० च्या अपवाद ४ चा लाभ देऊन बदल केला जाऊ शकतो.

<u>राज्याच्या वतीने सादर निवेदन</u> -

१९. महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने उपस्थित विद्वान वकील श्री. अभिकल्प प्रताप सिंग यांनी दुसरीकडे या अपीलाला जोरदारपणे विरोध केला आणि असे सादर केले की, कायद्यातील कोणत्याही त्रुटी बद्दल बोलू नये आणि उच्च न्यायालयाकडून अपील फेटाळतांना न्यायचौकशी न्यायालयाच्या दोषी ठरविण्याच्या आदेशाची आणि परिणामी सुनावलेल्या शिक्षेची पुष्टी केली, अशी कोणतीही चूक केली आहे, असे म्हणता येणार नाही.

२०. तो असे सादर करेल की, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या दृश्य पुराव्यावर संशय घेण्याचे कोणतेही

योग्य कारण नाही, जे अभिलेखावर आलेले आहे. त्यांनी पुढे असे सादर केले की, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी यातील अपीलकर्त्यांना कथित गुन्ह्यात खोटेपणाने गुंतवण्याचे कोणतेही योग्य कारण नाही.

२१. विद्वान वकिलांनी असे सादर केले की, भारतीय दंड संहितेच्या कलम ३०० च्या अपवाद ४ च्या कक्षेतील सदरचे प्रकरण कोणताही पुरावा समोर आणत नाही. त्यांनी पुढे जोरदारपणे असे सादर केले की, मयताच्या शरीरावर कोयता आणि तलवार सारख्या घातक शस्त्रांनी तब्बल नऊ जखमा केल्या होत्या. यातील अपीलकर्त्यांनी गैरफायदा घेतला आणि क्रूरपणे वागले असे म्हणता येईल.

२२. शेवटी, राज्याच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी असे सादर केले की, हत्यारांचा शोध लागणे हे आरोपींच्या वर्तनाकडे निर्देश करतो आणि असे वर्तन हे १८७२ च्या कायद्याच्या कलम ८ अन्वये संबद्ध परिस्थिती जी दृश्य पुराव्यांसोबत घेतले जाते आणि अभियोग पक्षाच्या खटल्यास पुष्टी देते.

२३. वर उल्लेख केलेल्या अशा परिस्थितीत, राज्याच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी अशी प्रार्थना केली की, प्रस्तुत अपीलामध्ये कोणतीही गुणवत्ता नसल्याने, सदरचे अपील फेटाळण्यात यावे.

<u>विश्लेषण</u>:-

२४. पक्षकारांच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि अभिलेखावरील बाबी तपासल्यानंतर आम्हास विचारात येणारा एकच प्रश्न हा आहे की, उच्च न्यायालयाने आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश पारित करण्यात काही चूक केली आहे का.

मौखिक पुराव्याचे आकलन -

२५. दृश्य पुराव्याचे आकलन करणे हे एक कठीण काम आहे. दृश्य पुराव्याचे आकलन करण्याकरता कोणतेही निश्चित किंवा सरळ साधे सूत्र नाही. फौजदारी खटल्यातील दृश्य पुरावांचे आकलन करण्यासाठी न्यायिकदृष्ट्या विकसित तत्वे ही खालीलप्रमाणे नमूद केली जाऊ शकतात :-

" I. साक्षीदाराच्या पुराव्याचे आकलन करताना, दृष्टिकोन हा साक्षीदाराच्या पुराव्याला संपूर्णपणे सत्याचे वलय आहे, हे दिसते की नाही असा असावा. एकदा का असे मत तयार झाले त्यानंतर मी निःसंशयपणे न्यायालयाने पुराव्यामध्ये निदर्शनास आणलेल्या त्रुटी, उणिवा आणि कमतरता लक्षात घेऊन पुराव्याची अधिक छाननी करणे आवश्यक आहे आणि ते त्याचे मूल्यमापन करून हे शोधणे आवश्यक आहे की, ते पुराव्याच्या सामान्य भावार्थाच्या विरुद्ध आहे की नाही आणि पुराव्याचे पूर्वीचे मूल्यमापन हे विश्वासार्हतेसाठी अयोग्य ठरवले जाते की नाही.

II. न्यायालयासमोर साक्षीदार साक्ष देतो त्या न्यायालयस साक्षीदाराने दिलेल्या पुराव्याच्या सामान्य भावार्थाबद्दल मत मांडण्याची संधी असल्यास, ज्या अपिलीय न्यायालयास हा लाभ नव्हता, त्यांना न्यायचौकशी न्यायालयाच्या पुराव्याच्या मूल्यांकन योग्य महत्त्व द्यावे लागेल आणि अत्यंत महत्त्वाची आणि फार मोठी कारणे असल्याशिवाय क्षुल्लक तपशिलांच्या बाबतीत किरकोळ फरक किंवा दुर्बलतेच्या आधारावर पुरावे नाकारणे योग्य होणार नाही.

III. जेव्हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची विस्तृत तपासणी केली जाते, तेव्हा

त्याच्यासाठी त्यामध्ये काही विसंगती करणे शक्य असते. परंतु, न्यायालयांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, जेव्हा साक्षीदाराच्या पुराव्यातील विसंगती त्याच्या कथनाच्या विश्वासार्हतेशी इतकी विसंगत असते तेव्हाच त्याचे पुरावे खोडून काढण्यात न्यायालय न्याय्य ठरते.

IV. प्रकरणाच्या मुळाला न जाणाऱ्या क्षुल्लक बाबींवरील किरकोळ विसंगती, पुराव्यांवरून इथल्या किंवा तिथल्या संदर्भाच्या बाहेरची वाक्ये घेऊन तांत्रिक दृष्टिकोन तपास अधिकाऱ्याने प्रकरणाच्या मुळाशी न जाता केलेल्या काही तांत्रिक त्रुटींना महत्त्व देणे हे सर्वसाधारणपणे संपूर्ण पुरावे नाकारण्याची परवानगी देत नाही.

V. एखाद्या घटनेच्या कथनात (दोन साक्षीदारांच्या पुराव्यांमधला किंवा एकाच साक्षीदाराच्या दोन कथनांमधला) केवळ फरकांवर अवलंबला जाण्याचा अत्यंत गंभीर दृष्टिकोन न्यायालयीन छाननीसाठी एक अवास्तव दृष्टिकोन आहे.

VI. थोडक्यात, साक्षीदाराकडे छायाचित्रणासारखी स्मृती असणे आणि घटनेचा पूर्ण तपशील आठवणे याची अपेक्षा केली जाऊ शकत नाही. हे मनाच्या पडद्यावर एखादी व्हिडिओ टेप पुन्हा चालवण्यासारखे नाही.

VII. साधारणपणे असे घडते की, साक्षीदार घटनांनी मागे पडतो. साक्षीदाराला अशा घटनेचा अंदाज येत नव्हता ज्यामध्ये अनेक आश्चर्याचे घटक असतात. त्यामुळे, मानसिक क्षमता ही घटनेचा तपशील आत्मसात करण्यासाठी अनुकूल असणे अपेक्षित नाही.

VIII. निरीक्षणाची शक्ती ही व्यक्तीपरत्वे भिन्न असते. एखाद्याला काय लक्षात येईल, तेच दुसऱ्याला येईल असे नाही. एखादी वस्तू किंवा हालचाल एखाद्या व्यक्तीच्या मनावर तिची प्रतिमा उमटवू शकते, तर दुसऱ्याच्या लक्षातही ती जाऊ शकते.

IX. थोडक्यात, व्यक्ती ही केलेले संभाषण अचूकपणे आठवू शकत नाहीत आणि त्यांनी वापरलेले किंवा ऐकलेले शब्द पुनरुत्पादित करू शकत नाहीत. व्यक्ती फक्त संभाषणाचा मुख्य हेतू लक्षात ठेवू शकतात. साक्षीदार हा मानवी टेप रेकॉर्डर असावा अशी अपेक्षा करणे अवास्तव आहे.

X. एखाद्या घटनेची नेमकी वेळ किंवा घटनेच्या कालावधीच्या संदर्भात, सर्वसाधारणपणे लोक हे चौकशीच्या वेळी, त्या क्षणाचा अंदाज घेऊन त्यांचे अंदाज बांधतात आणि अशा प्रकरणांमध्ये लोकांनी अगदी अचूक किंवा विश्वासार्ह अंदाज लावावा अशी अपेक्षा कोणी करू शकत नाही. पुन्हा ते व्यक्तींच्या वेळेच्या जाणिवेवर अवलंबून असते, जे व्यक्तीपरत्वे बदलते.

XI. साधारणपणे, साक्षीदाराकडून एका पाठोपाठ किंवा कमी कालावधीत घडणाऱ्या घटनांचा क्रम अचूकपणे आठवण्याची अपेक्षा करता येत नाही. साक्षीदार गोंधळून जाण्यास किंवा नंतर जेव्हा चौकशी होते तेव्हा संभ्रम अवस्थेत जाण्याची शक्यता असते.

XII. साक्षीदार हा जरी पूर्णपणे सत्य असला तरी, न्यायालयीन वातावरण आणि वकिलाद्वारे झालेली बोचक उलटतपासणी आणि चिंतेमुळे घटनेच्या तथ्यांबाबत गोंधळ उडून, घटनेच्या क्रमांबाबत गोंधळून जाणे किंवा क्षणात

एखाद्या घटनेच्या क्रमाची जागा कल्पनाशक्तीने भरणे, या गोष्टी त्यास भयाकुल ठरू शकतात. साक्षीदाराचे अवचेतन मन काही वेळा मूर्ख दिसण्याच्या किंवा अविश्वास दिसण्याच्या भीतीने कार्य करते. तरी, साक्षीदार त्यासमोर घडलेल्या घटनेची सत्य आणि प्रामाणिकपणे माहिती देत असतो.

XIII. पूर्वीचे विधान हे जरी पुराव्याशी विसंगत दिसत असले तरी ते विरोधाभासासाठी पुरेसे असणे आवश्यक असते. जोपर्यंत आधीच्या विधानात नंतरच्या विधानावर अविश्वास दाखवण्याची क्षमता नसते, जरी नंतरचे विधान हे काही प्रमाणात आधीच्या विधानाशी भिन्न असले तरी त्या साक्षीदाराला विरोध करणे उपयुक्त ठरणार नाही.

[पहा : **भरवाडा भोगीनभाई हिरजीभाई वि. गुजरात** राज्य १९८३ क्रि. एल जे १०९६ : (एआयआर १९८३ एससी ७५३) **लिला राम वि. हरयाणा राज्य** एआयआर १९९५ एससी ३७१७ आणि **तहसिलदार सिंग वि. यूपी राज्य** (एआयआर १९५९ एससी १०१२)]

२६. जेव्हा जखमी प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करावयाचे असल्यास, न्यायालयांनी खालीलप्रमाणे स्पष्टपणे मांडलेली कायदेशीर तत्वे लक्षात ठेवणे आवश्यक आहे :-

(अ) जखमी झालेल्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराच्या साक्षी मध्ये महत्वपूर्ण विरोधाभास असल्याशिवाय घटनेच्या वेळी आणि घटनास्थळी त्याच्या उपस्थितीबद्दल शंका घेतली जाऊ शकत नाही.

(ब) जोपर्यंत पुराव्यांद्वारे अन्यथा सिद्ध होत नाही, तोपर्यंत असा विश्वास ठेवला पाहिजे की जखमी साक्षीदार खऱ्या गुन्हेगारांना पळून जाऊ देणार नाही आणि आरोपीला खोटे गुंतवू देणार नाही.

(क) जखमी साक्षीदाराच्या साक्षीला पुराव्यासंबंधी खूपच जास्त किंमत आहे आणि अशी सक्तीची कारणे असल्याशिवाय, त्यांची विधाने सहजपणे टाकून देऊ नयेत.

(ड) नैसर्गिक आचरणाला शोभा आणणाऱ्या गोष्टी किंवा किरकोळ विरोधाभास यामुळे जखमी साक्षीदाराच्या साक्षीवर संशय घेतला जाऊ शकत नाही.

(इ) जखमी साक्षीदाराच्या साक्षी मध्ये कोणतीही अतिशयोक्ती किंवा महत्त्वाची नसलेली शोभा आणणारी गोष्ट आढळल्यास, असा विरोधाभास, अतिशयोक्ती किंवा अलंकार जखमींच्या साक्षीमधून काढून टाकले जावे, परंतु संपूर्ण साक्ष नाही.

(फ) अभियोग पक्षाने सादर केलेली साक्ष सविस्तर विचारात घेतली पाहिजे आणि काळानुसार स्मरणशक्ती कमी झाल्यामुळे उद्भवणाऱ्या तफावती काढून टाकल्या पाहिजे.

२७. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या साक्षीच्या मूल्याचे मूल्यांकन करताना, दोन मुख्य बाबी आहेत की, खटल्याच्या परिस्थितीत, घटनादृश्याच्या वेळी त्यांच्या उपस्थितीवर विश्वास ठेवणे शक्य आहे का अथवा अशा परिस्थितीत त्यांनी शपथेवर मांडलेल्या तथ्यांची साक्ष देणे त्यांना हे शक्य होईल का आणि दुसरे म्हणजे, त्यांच्या साक्षीमध्ये स्वाभाविकपणे असंभाव्य किंवा अविश्वसनीय काहीही आहे का. या दोन्ही विचारांतर स्वत: त्या साक्षीदारांकडून काढलेल्या किंवा इतर पुराव्यांद्वारे त्यांची च्या

संदर्भात, एकउपस्थिती असंभवनीय करण्यासाठी किंवा त्यांच्या विधानांची सत्यता अविश्वसनीय करण्यासाठी सिद्ध केलेल्या परिस्थितीचा परिणाम, न्यायालय त्यांच्या साक्षीला जोडेल त्या मूल्यावर होईल. ज्या प्रकरणांमध्ये आरोपीचे प्रतिकथन केवळ नकार असला तरी, जेथे आरोपी निश्चित प्रतिकथन उपस्थित करतो किंवा सकारात्मक बाजू मांडतो जी, फिर्यादी पक्षाशी विसंगत आहे, फिर्यादी पक्षाच्या साक्षीदारांच्या साक्षी त्यांच्या स्वतःच्या गुणवत्तेवर तपासले पाहिजेत, फिर्यादी पक्षाच्या साक्षीचे मूल्य मूल्यमापन करताना, अशा प्रतिकथनाचे किंवा खटल्याचे स्वरूप आणि त्या संदर्भातील शक्यता देखील विचारात घ्याव्या लागतील

२८. कायद्याची उपरोक्त तत्त्वे लक्षात ठेवून, आम्ही तिन्ही महत्त्वाच्या साक्षीदारांचे, म्हणजे स.सा.१ असगर शेख (नि. ७), स.सा. २ फिरोज बाबुमियाँ शेख (नि. ९) आणि स.सा. ३ नासिर खान. (नि. १०) यांची तोंडी साक्ष तपासली. तिन्ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची तोंडी साक्ष सुसंगत आहे आणि तिन्ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी सांगितलेल्या कथनाच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या आवृत्तीवर विश्वास न ठेवण्याचे कोणतेही चांगले कारण नाही. न्यायचौकशी न्यायालयाने तसेच उच्च न्यायालयाने वर उल्लेख केलेल्या तीनही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची तोंडी साक्ष बारकाईने पाहिली आणि ते विश्वसनीय साक्षीदार असल्याचे समवर्ती निष्कर्ष नोंदवले.

२९. उच्च न्यायालयाने त्यांच्या आक्षेपित न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ९ आणि १० मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले :

"९. प्रथम, अपीलकर्त्यांच्या वतीने विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला आहे की कथित प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, स.सा. क्रमांक १ आणि २ हे

मृत अब्बास बेगशी हितसंबंध असलेले आणि नाते संबंध असलेले साक्षीदार असल्याने, त्यांचे ठोस पुरावे विश्वसनीय म्हणून घेतले जाऊ शकत नाहीत. दुसरे असे की, जखमी अब्बास यांना लोहियानगर पोलीस चौकीत आणले असता आरोपींची नावे तात्काळ उघड झाली नसल्याचा युक्तिवाद केला जात आहे आणि जेव्हा सदर अब्बास आणि दोन्ही जखमी, स.सा. क्र. १ व २ यांना वैद्यकीय उपचारासाठी ससून रुग्णालयात पाठविण्यात आले त्यावेळी हल्ल्याचा कोणताही इतिहास दिलेला नाही. तिसरे म्हणजे, असा युक्तिवाद केला जातो की स.सा. १, फिर्यादी यांनी, अब्बासच्या डोक्याला दुखापत झाल्याचे नमूद करून त्याच्या कथेत सुधारणा केली होती आणि तक्रार देताना मात्र त्याने तसा उल्लेख केला नव्हता. चौथे, असा युक्तिवाद केला जातो की, मुख्य महत्वाची दुखापत घटनांच्या सामान्यक्रमात होती, शवविच्छेदन अहवालाप्रमाणे अब्बासच्या मृत्यूस कारणीभूत ठरण्यासाठी पुरेशी दुखापत क्र. ९, तलवारीच्या सहाय्याने बनविली गेली असल्याने आणि अशीही ती जखम अपीलकर्ता क्रमांक १ यांनी केलेली नसल्यामुळे, तिचा संबंध आरोपी क्र. ३ म्हणजेच अपीलकर्ता क्रमांक २ यांच्याशी लावला होता. असा शेवटचा युक्तिवाद मांडून, अपीलकर्त्याच्या वतीने, अब्बासचा मृत्यू शवविच्छेदन अहवालातील अनुक्रमांक नं. ९ मधील दुखापतीमुळे झाला यावर भर दिला आणि त्यामुळे अपीलकर्ता-आरोपी क्रमांक १ यांना अब्बासच्या मृत्यूस जबाबदार धरता येऊ शकले नाही, असा युक्तिवाद केला.

१०. अशा युक्तिवादांना सामोरे जाताना, वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यांच्या वतीने, आम्ही स.सा. १ आणि २ आणि घटनांच्या मुख्य भागाला परिपोषक अनुषंगिक साक्षीदार, म्हणजे स.सा. क्र. ३ चे ठोस पुरावे काळजीपूर्वक तपासले आणि असे म्हटले पाहिजे की लोहियानगर पोलिस चौकीत पोहोचल्यानंतर लगेच स.सा. १ ने तक्रार दाखल केली आणि तोपर्यंत अब्बासला देखील पोलिस चौकीत आणण्यात आले आणि त्यानंतर त्याला उपचारासाठी ससून रुग्णालयात पाठवण्यात आले. मात्र, दाखल झाल्यावर त्याला मृत घोषित करण्यात आले. स.सा. १ च्या ठोस पुराव्यामध्ये असे आहे की, तो आणि स.सा. २ पोलिस यादीसह ससून रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी उपस्थित होते, ही वस्तुस्थिती आहे की, स.सा. क्रमांक १ आणि २ ला झालेल्या दुखापतीबाबत फिर्यादीने पक्षाने अभिलेखावर कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र आणलेले नाही आणि अशा वस्तुस्थितीनुसार सत्र न्यायालयास असे धरण्यास प्रवृत्त केले की, साक्षीदार क्रमांक १, तक्रारदारावर झालेल्या हल्ल्यासाठी भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ सह ३४ अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी कोणतेही आरोप सिद्ध केलेले नाहीत. हे देखील लक्षात आले आहे की अब्बासचा मृत्यू अनेक जखमांमुळे झाला असला तरी, वैद्यकीय अधिकारी, स.सा. क्रमांक ७ यांच्या मते, मुख्य इजा, जी अब्बासच्या मृत्यूस कारणीभूत ठरू शकते, ती इजा क्रमांक ९ शव विच्छेदन अहवालामध्ये नमूद केलेली आहे. दुसऱ्या शब्दांत, असे म्हटले पाहिजे की अब्बासला झालेल्या सर्व जखमा त्याच्या

परिणामी मृत्यूचे कारण होते आणि संबंधित शस्त्रे म्हणजे वस्तू क्र. १६ कोयता आणि वस्तू क्र. १७ तलवारीचा वापर करणाऱ्या आरोपी-अपीलकर्त्यांचा एका भूमिकेशी संबंध लावला. "

३०. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १३६ खालील अधिकारांचा वापर करून हे न्यायालय, सामान्यतः, अत्यंत विशेष परिस्थितीत किंवा खालील न्यायालयांनी केलेल्या घोर त्रुटीच्या बाबतीत वगळता, वस्तुस्थितीच्या समवर्ती निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप करणार नाही. केवळ जेथे उच्च न्यायालय "ओरडून सांगणारी परिस्थिती" आणि "सिद्ध झालेली तथ्ये" दुर्लक्षित करते किंवा काणाडोळा करते किंवा "गुन्हेगारी न्यायशास्त्राच्या सुस्थापित तत्त्वांचे उल्लंघन करते आणि चुकीचा वापर करते" किंवा आरोपी व्यक्तिंना संशयाचा लाभ देण्यास नकार देते, इ. कायदेशीररित्या चुकीचे निर्णय दुरुस्त करण्यासाठी हे न्यायालय यात पाऊल टाकेल. जोपर्यंत, अर्थातच, निष्कर्ष दुरुस्त करण्याची सक्ती असणारी परिस्थिती असत नाही आणि आरोपी निर्दोष/दोषी असत नाही, केवळ एका वेगळ्या निष्कर्षावर पोहोचू शकतो या कारणास्तव आम्ही देखील हस्तक्षेप करू नये. निःसंशयपणे, समवर्ती स्वरूपाच्या अपराधसिद्धीच्या निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप करण्यास मर्यादा आहेत.

३१. या अपीलाच्या सुनावणीदरम्यान, प्रकरणाच्या मुळाशी जाता एक अतिशय महत्त्वाची गोष्ट आमच्या लक्षात आली.

३२. आमच्या लक्षात आले की, मूळ प्रथम माहिती देणारा, स.सा. १, असगर शेख (नि. ७) च्या उलटतपासणीत बचाव पक्षाच्या वकिलाने काही सूचित केले होते. आम्ही पहिल्या माहिती देणाऱ्याच्या उलट तपासणी संबंधित भाग उद्धृत करतो:

“आमच्यावर अचानक हल्ला झाला. पहिला आघात माझ्या डोक्यावर झाला. माझ्या डोक्यावर जबर वार करण्यात आले. मारहाणीमुळे मला रक्तस्त्राव झाला. मारहाणीमुळे मला चक्कर आली हे खरे नाही. होय मला वेदना मात्र सहन कराव्या लागल्या. त्यावेळेस मी माझा जीव वाचवावा असे वाटले नाही. मी पळून जावे किंवा स्वतःला लपवण्याचा प्रयत्न करावा असे मला वाटले नाही. मी लोहिया नगर पोलीस चौकीच्या बाजूच्या दिशेने गेलो. विनाकारण माझ्यावर हल्ला होत आहे असे मला वाटले. मारहाण होत असताना अब्बास ओरडत होता. ...”

३३. उपरोक्त कथनावरून आमचे असे मत आहे की, बचाव पक्षाच्या वकिलांनी प्रत्यक्षदर्शींच्या उलट तपासणीत मांडलेल्या सूचनांवरून स.सा. १, असगर शेखची घटनास्थळी उपस्थिती सिद्ध होते आणि हल्ल्याची वस्तुस्थिती देखील मान्य केली आहे असे म्हणता येईल. सूचनांचे उत्तर अपीलकर्त्यांसाठी विद्वान वकिलांनी केलेल्या निवेदनाचे उत्तर देते की स.सा. १, असगर शेखवर विश्वास ठेवू नये किंवा त्याच्यावर विसंबून राहू नये कारण तो जखमी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होता हे सूचित करण्यासाठी अभिलेखावर काहीही नाही. बचाव पक्षाने स.सा. असगर शेखची उपस्थिती मान्य केली असे म्हणता येईल. स.सा. १ असगर शेखच्या उलटतपासणीचा उपरोक्त भाग बचाव पक्षाच्या वकिलांच्या निदर्शनास आणून दिला तेव्हा, त्यांनी असे सादर केले की, एखाद्या साक्षीदाराच्या उलट तपासणीत बचाव पक्षाच्या वकिलांनी मांडलेल्या सूचनांना, साक्षीचे कोणतेही मूल्य नाही आणि जरी तो दोषी असल्याचे, ते कोणत्याही प्रकारे दाखवीत असले तरी ते आरोपीवर

बंधनकारक नसेल कारण बचाव पक्षाला, आरोपी दोषी ठरविण्याच्या वस्तुस्तिथीचा दोष मान्य करण्याचे कोणतेही गर्भित अधिकार नाहीत.

३४. विद्वान वकिलांच्या मते, अशा सूचना साक्षीदाराची विश्वासार्हता धोक्यात आणण्यासाठी बचाव धोरणाचा एक भाग असू शकतात. फिर्यादीला आवश्यक असलेला अपराधाचा पुरावा साक्षीदाराच्या केलेल्या समाधानावर अवलंबून नाही.

३५. **तरुण बोरा उर्फ** आलोक हजारिका विरुद्ध आसाम राज्य या २००२ मध्ये क्रिमी. एलजे ४०७६, मध्ये प्रकाशित प्रकरणात या न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने टाडा सत्र प्रकरणात गुवाहाटीच्या नामनिर्देशित न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरुद्ध अपील हाताळले होते, ज्यामध्ये अपीलकर्त्याला भा. द. वि. च्या कलम ३६५ सह दहशतवादी आणि विघटनकारी क्रियाकलाप (प्रतिबंध) अधिनियम १९८७ च्या कलम ३(१) आणि ३(५) अन्वये दोषी ठरवण्यात आले होते.

३६. उपरोक्त प्रकरणात, या न्यायालयाने, अभिलेखावरील पुरावे विचारात घेताना, एका साक्षीदारापुढे ठेवलेल्या सूचनेची नोंद घेतली आणि आरोपीने मांडलेल्या सूचनेला साक्षीदाराने दिलेले उत्तर लक्षात घेऊन, या निष्कर्षावर पोहोचले की आरोपीची उपस्थिती मान्य करण्यात आली. या न्यायालयाने परिच्छेद १५, १६ आणि १७ मध्ये दिलेली खालील निरीक्षणे आम्ही फायद्यासह उद्धृत करतो:

"१५. साक्षीदाराने पुढे सांगितले की, हल्ल्यादरम्यान हल्लेखोराने त्याच्यावर युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उल्फा) बद्दल लष्कराला माहिती दिल्याचा आरोप केला. त्याने पुढे सांगितले की तिसऱ्या रात्री त्याचे डोळे बांधून त्याला सायकलवरुन वेगळ्या ठिकाणी नेण्यात आले आणि जेव्हा त्याचे डोळे उघडले तेव्हा त्याला त्याचा धाकटा भाऊ-कुमुद काकती (स. सा.-२) आणि त्यांची पत्नी श्रीमती. प्रेमा काकती (स. सा.-३) दिसले. ते ठिकाण होते दुलियापाथेर, जे त्याच्या साक्राही गावापासून सुमारे ६-७ किमी दूर आहे. साक्षीदाराने अपीलकर्ता-तरुण बोराला ओळखले आणि सांगितले की तो तोच आहे ज्याने त्याला घटनेच्या तारखेला नंदेश्वर बोरा यांच्या निवासस्थानापासून अँबेसिडर कार मध्ये नेले.

१६. उलट तपासणीत साक्षीदाराने खालीलप्रमाणे सांगितले: "आरोपी-तरुण बोराने माझे डोळे बांधले नाहीत किंवा त्याने माझ्यावर हल्ला केला नाही."

१७. उलटतपासणीचा हा भाग संपूर्ण प्रकरणामध्ये आरोपी- तरुण बोराची उपस्थिती दर्शवतो. यावरून आरोपी-तरुण बोरा यांची कबुली दिल्याप्रमाणे उपस्थिती स्पष्टपणे सूचित होईल. नकार एवढाच आहे की आरोपीने साक्षीदाराचे डोळे झाकण्यात भाग घेतला नाही किंवा त्याच्यावर हल्ला केला नाही."

३७. **राकेश कुमार उर्फ बबली विरुद्ध हरियाणा राज्य** या (१९८७) २ एस सी सी ३४ मध्ये प्रकाशित या प्रकरणात, हे न्यायालय, सत्र न्यायाधीशांच्या आदेशाची, ज्याद्वारे अपीलकर्ता आणि इतर तीन व्यक्ती यांना भा. द. वि. कलम ३०२ सह कलम ३४ अंतर्गत सिद्धापराधी ठरविण्यात आले

होते, पुष्टी करणाऱ्या उच्च न्यायालयाच्या निर्णया विरुद्ध अपील हाताळत होते. अभिलेखावरील पुराव्यांचे पुन्हा आकलन करताना या न्यायालयाच्या लक्षात आले की, स. सा. क्र. ४, सुबे सिंग यांच्या उलटतपासणीमध्ये, घटनेच्यावेळी आरोपींपैकी एकाने परिधान केलेल्या शर्टच्या रंगाबाबत सुचविण्यात आले होते. या न्यायालयाने बचाव पक्षाने मांडलेल्या सूचनेचे स्वरूप आणि उत्तर विचारात घेऊन असा निष्कर्ष काढला की, घटना घडली तेव्हा घटनास्थळी धरमवीर नावाच्या आरोपीची उपस्थिती सिद्ध होते. या न्यायालयाने अनुक्रमे परिच्छेद ८ आणि ९ मध्ये दिलेली निरीक्षणे आम्ही खालीलप्रमाणे उद्धृत करतो:

> *"८ . स. सा. क्र. ३, भगतसिंग यांनी त्यांच्या उलट तपासणीमध्ये सांगितले की त्यांनी घटनेच्या वेळी आरोपीला ओळखले होते. पण आश्चर्याची बाब म्हणजे, विद्वान सत्र न्यायाधीशांनी निदर्शनास आणल्याप्रमाणे, तो आरोपीस कसा आणि कोणत्या पद्धतीने ओळखू शकला याबाबत त्याची उलटतपासणी घेण्यात आली नाही. त्या ठिकाणी अंधार असल्याने मृतांच्या हल्लेखोरांची ओळख पटवणे शक्य नाही, अशी कोणतीही सूचना त्यांच्यासमोर मांडण्यात आली नाही.*
>
> *९ . स. सा. क्र. ४, सुबे सिंग यांनी त्यांच्या उलटतपासणीत, सांगितले की आरोपी धरम वीर याने पांढऱ्या रंगाचा शर्ट घातला होता. धरम वीरने क्रीम कलरचा शर्ट घातला होता, असे आरोपीच्या वतीने त्याला सुचवण्यात आले. त्या सूचनेला उत्तर देताना स. सा. क्र. ४ म्हणाले: "धरम वीर आरोपीने त्यावेळी पांढरा नसून क्रीम कलरचा शर्ट घातला होता हे म्हणणे बरोबर नाही." विद्वान*

सत्र न्यायाधीशांनी योग्य निरीक्षण मांडले आहे की वरील सूचना, किमान, घटनेच्या वेळी आरोपी धरम वीरची तेथे उपस्थिती सिद्ध करते.”

३८. अशाप्रकारे, वरील निरीक्षणावरून वरून हे उघड होते की, बचाव पक्षाच्या वकिलाने उलटतपासणीत साक्षीदारासमोर मांडलेली सूचना कोणत्याही प्रकारे गुन्ह्यामध्ये गुंतवणारी आढळल्यास आरोपीवर निश्चितच बंधनकारक होईल आणि आरोपीला, त्याच्या वकिलाला त्याच्या अशीलाच्या विरुद्ध कबुली स्वरूपसदृश सूचना करण्याचा कोणताही गर्भित अधिकार नव्हता, ही सबब सांगून स्वतःची सुटका करून घेत येणार नाही.

३९. कायद्याच्या मुद्द्यावरील सवलत वगळता, बचाव पक्षाच्या वकिलाने घटनेबाबत मांडलेली कोणतीही सवलत किंवा कबुली त्याच्या अशिलावर निश्चितपणे बंधनकारक असेल. कायदेशीर प्रस्ताव म्हणून आम्ही अपीलकर्त्यांच्या वतीने सादर केलेल्या विधानाशी, जसे की, उलटतपासणीमध्ये बचाव पक्षाच्या वकिलाने मांडलेल्या सूचनेला साक्षीदाराने दिलेले उत्तर कोणत्याही प्रकारे आरोपीला दोषी ठरवत असेल तर त्याचे कोणतेही मूल्य किंवा ते उपयोगिता पात्र नाही, याच्याशी सहमत होऊ शकत नाही.

४०. हे गुन्हेगारी न्यायशास्त्राचे मुख्य तत्व आहे की आरोपीविरुद्ध वाजवी संशयापलीकडे खटला सिद्ध करण्याचा प्रारंभिक भार अभियोग पक्षावर असतो. कायद्याचे हे देखील प्राथमिक तत्व आहे की अभियोग पक्षाने स्वतःचा खटला स्वतःच्या पायावर सिद्ध केला पाहिजे आणि तो बचाव पक्षाच्या कमकुवतपणाचा फायदा किंवा लाभ मिळवू शकत नाही. आम्ही एका क्षणासाठीही असे सुचवत नाही की जर अभियोग पक्ष स्वतःच्या पायावर केस सिद्ध करू शकत नसेल तरीही, बचाव पक्षाच्या वकिलांनी साक्षीदारासमोर मांडलेल्या सूचनांना त्याने दिलेल्या उत्तराच्या स्वरूपातील पुराव्याच्या

बळावर न्यायालय आरोपीला दोषी ठरवू शकते. उदाहरणार्थ, सध्याच्या प्रकरणात आम्ही या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहोत की तीन प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या पुराव्यांवरून आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्यांच्या पुराव्यात असे काहीही नाही ज्याच्या आधारे ते अविश्वसनीय साक्षीदार आहेत असे म्हणता येईल. अशा निष्कर्षापर्यंत पोचल्यावर, आमच्या मते, आमचे मत दृढ करण्यासाठी, बचाव पक्षाच्या वकिलांनी प्रत्यक्षदर्शींसमोर मांडलेल्या सूचना, व त्यांना दिलेली उत्तरे आरोपी तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची रात्रीच्या वेळी उपस्थिती प्रस्थापित होते ती आम्ही निश्चितपणे लक्षात घेऊ शकतो. हेच दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, जर सूचना ह्या कोणत्याही प्रकारे गुन्ह्यामध्ये गुंतविणाऱ्या असल्यास किंवा अभिलेखावर इतर कोणत्याही विश्वसनीय पुराव्याच्या अनुपस्थितीत कबूलीच्या स्वरुपात असल्यास त्या स्वतःच आरोपीला दोषी धरण्यासाठी पुरेशा नाहीत. हे खरे आहे की एखाद्या सूचनेला कोणतेही पुरावा मूल्य नसते परंतु कायद्याचा हा प्रस्ताव नेहमीच चांगला नसतो आणि प्रस्तुत प्रकरणात उलटतपासणी दरम्यान बचाव पक्षाचे वकील अशी सूचना देऊ शकतात ज्याचे उत्तर थेट आरोपीच्या विरोधात जाऊ शकते, आणि सध्याच्या प्रकरणात नेमके हेच घडले आहे.

४१. फौजदारी खटल्यात, खटल्याच्या पुढील प्रगतीदरम्यान वकिलाला त्याच्या अशीलाच्या विरोधात कबुली देणारी विधाने सूचविण्याचे कोणतेही गर्भित अधिकार नसतात हे कायद्याचे तत्त्व केवळ अशा प्रकरणांमध्येच चांगले राहील जेथे अभियोग पक्षाकडून पुरावे देणे यास कायद्यानुसार परवानगी नाही. उदाहरणार्थ, डॉक्टरांची साक्ष घेऊन शवविच्छेदन अहवाल सिद्ध करणे अभियोग पक्षावर बंधनकारक आहे. आरोपी शवविच्छेदन अहवालातील मजकूर कबूल करू शकत नाही ज्यामुळे डॉक्टरांची साक्ष नोंदवून कायद्यानुसार त्यातील मजकूर सिद्ध करण्याच्या कर्तव्यातून अभियोग पक्षाला सूट मिळेल. याचे कारण असे की जर पुरावा हा स्वतःच कायद्याने अग्राह्य असेल

तर बचाव पक्षाच्या वकिलाला त्याच्या स्वतःच्या संमतीने तो ग्राहय होईल असे काहीही करण्याचा अधिकार नाही.

४२. त्यामुळे, आमचे असे मत आहे की बचाव पक्षाच्या वकिलाने साक्षीदारासमोर मांडलेल्या सूचना आणि अशा सूचनांना दिलेले उत्तर हे निश्चितपणे पुराव्याचा भाग बनतील आणि न्यायालय हे आरोपीला दोषी ठरवण्यासाठी अभिलेखावरील इतर पुराव्यांसह त्यावर अवलंबून राहू शकते.

४३. उलटतपासणीचा मुख्य उद्देश म्हणजे अभिलेखावरील सत्य शोधणे आणि खटल्याचे सत्य जाणून घेण्यात न्यायालयाला मदत करणे असा आहे. अनेकवेळा, बचाव पक्षाच्या वकिलांनीच, उलटतपासणी दरम्यान, उद्भवलेल्या विसंगती एका परिच्छेदात स्पष्ट केल्याचा आणि दुसऱ्या परिच्छेदात त्याबाबत स्वतःच विरोधाभास निर्माण करून घेतल्याचा सर्वसामान्य अनुभव आहे. उलटतपासणीची दिशा ही नेहमीच बचावाच्या आधारावर असते जी आरोपीचा बचाव करण्यासाठी वकील लक्षात ठेवेल. या टप्प्यावर, आम्ही, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने, गोविंद - पिता - सोनराम विरुद्ध मध्य प्रदेश राज्य २००५ क्रिमीनल लॉ जर्नल १२४४ ह्या प्रकरणामध्ये नोंदविलेले अभीक्षण त्याच्या फायदयासह उद्धृत करू इच्छितो. खंडपीठाने परिच्छेद २७ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण मांडले आहे:

> *"२७. उलटतपासणीचा मुख्य उद्देश मानवी साक्षीतील सत्य शोधणे आणि खोटेपणा शोधणे हा आहे. साक्षीदाराने आधीच वैयक्तिकरित्या दिलेला पुरावा नष्ट करण्यासाठी किंवा कमकुवत करण्यासाठी किंवा त्याने न सांगितलेले पक्षकाराच्या बाजूने काहीतरी स्पष्ट करण्यासाठी किंवा त्याचा भूतकाळातील इतिहास आणि वर्तमान वर्तनावरून तो अयोग्य असल्याचे*

दाखवून त्याला बदनाम करण्यासाठी ही रचना केलेली आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे की उलटतपासणी हे एक कर्तव्य आहे, जे एक वकील त्याच्या अशीलाचे देणे लागतो आणि ते वैयक्तिक वैभव आणि कीर्तीचा विषय नाही. हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की अयोग्य उलटतपासणीमुळे न्यायाचा पराभव होऊ नये. वकिलाच्या स्वतःच्या कर्तव्याचा भाग आहे की उलटतपासणी ही सर्वात कठीण कला आहे. तथापि, तो निकाल प्राप्त करण्यात अयशस्वी होऊ शकतो परंतु निष्पक्षता हा वकिलीच्या महान घटकांपैकी एक आहे. प्रतिभा आणि अलौकिक बुद्धिमत्तेचा हेतू स्वत: ची प्रशंसा करणे नाही तर सत्य स्थापित करणे, असत्य शोधणे, योग्य आणि न्यायाचे समर्थन करणे आणि अप्रामाणिक साक्षीदाराच्या चुकीच्या गोष्टी उघड करणे हा असला पाहिजे. सत्य शोधण्याची ही सर्वात प्रभावी चाचणी आहे. उलटतपासणी ही पक्षपातीपणा उघड करते, खोटेपणा शोधते, साक्षीदारांची मानसिक आणि नैतिक स्थिती दर्शवते आणि साक्षीदार योग्य हेतूने वागला आहे की नाही किंवा तो त्याच्या प्रतिस्पर्ध्याशी शत्रुत्वाने वागला आहे का, याचा शोध घेते. उलटतपासणी ही सामान्यतः वकिलाच्या कौशल्याची सर्वात कठीण चाचणी मानली जाते आणि कदाचित ती त्याच्या इतर कोणत्याही कर्तव्याच्या पलीकडे त्याची कल्पकता उपयोगात आणण्याची मागणी करते. विश्वासार्ह कौशल्याने उलटतपासणी घेण्यात मोठी अडचण असते. निःसंशयपणे हा एक मोठा बौद्धिक प्रयत्न आहे. काहीवेळा उलटतपासणी अनावश्यक कालावधीपर्यंत लांबते, अशा

प्रकरणांमध्ये, न्यायालयाला अशा उलटतपासणीवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार असतो. (साक्षीदारांची उलटतपासणी या मुद्द्यावर रॉटस्की यांनी जे लिहिले आहे ते वाचा). न्यायालयाने याची देखील खात्री केली पाहिजे की उलटतपासणी ही गुन्ह्यातील पीडित व्यक्तिला त्रास देण्याचे किंवा तिचा अपमान करण्याचे साधन बनवले जाणार नाही. [पंजाब राज्य वि. गुरुमित सिंग, १९९६ सुप्रीम कोर्ट केसेस (फौजदारी) ३१६ मधील न्यायनिर्णय वाचा].”

४४. उलटतपासणी दरम्यान, साक्षीदारावर अविश्वास दाखविण्याच्या हेतूने किंवा संभाव्यतेच्या अधिकतेवर बचाव प्रस्थापित करण्याच्या हेतूने साक्षीदारावर सूचनांचा भडीमार केला जातो परंतु जर अशा सूचना, ज्यास दिल्या गेलेल्या उत्तरामुळे त्या कोणत्याही पद्धतीने आरोपीला दोषी ठरवत असतील तर त्या सूचनांना दिले गेलेले उत्तर निश्चितपणे बंधनकारक असेल आणि त्याच्या समर्थनार्थ अभिलेखावरील इतर पुराव्यांसह विचारात घेतले जाऊ शकते.

४५. तथापि, हे सर्व सूचनांचे स्वरूप यावर अवलंबून असेल आणि मनातील कोणत्या कल्पनेने अशा सूचना साक्षीदारासमोर मांडल्या जातात यावर अवलंबून असेल. उदाहरणार्थ, भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अंतर्गत बलात्काराचा आरोप असलेल्या प्रकरणामध्ये, आरोपीच्या कथनामध्ये स्पष्ट नकार आणि त्यास प्रकरणामधे खोटे गुंतविण्यात आले आहे असे प्रतिपादन असते, आणि अशा परिस्थितीत, त्यानंतर बचाव पक्षाच्या वकिलाने फिर्यादीला तिच्या याबाबतीतल्या संमतीबद्दल दिलेली सूचना, यामुळे स्वतःहून, आरोपीच्या वतीने अपराध कबूल केल्यासारखे होत नाही. बलात्काराच्या प्रकरणात आरोपीला एकापेक्षा जास्त बचाव करण्याची

परवानगी आहे. अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये बचाव पक्षाच्या वकिलाने फिर्यादी साक्षीदारा समोर मांडलेली सूचना ही आरोपीच्या बाजूने गुन्ह्याची कबुली देणारी ठरत नाही. त्याच वेळी, अभियोक्ता स्त्रीच्या उलटतपासणीत बचाव पक्षाने, तिची संमती ह्या त्यांच्या पर्यायी बचावाला समर्थन देण्यासाठी, बलात्काराच्या गुन्ह्यासाठी आरोपीला अडकवू शकेल अशा प्रश्नांची उत्तरे सूचनांच्या स्वरूपात मिळविली तर अशा सूचनांमुळे अभियोग पक्षाने दाखल केलेल्या फौजदारी प्रकरणाचे निश्चितच समर्थन होईल आणि न्यायालयाकडून असे दिलेले समर्थन विचारात घेणे हे योग्य ठरेल. आम्ही आणखी एका प्रकरणाचे उदाहरण देऊ इच्छितो, जेथे आरोपी त्याच्या खाजगी बचावाच्या हक्काचा दावा करेल. असा बचाव आरोपीला नेहमीच उपलब्ध असतो, परंतु जरी खटल्याच्या वेळी असा बचाव विशेषत: घेतला गेला नसला तरीही, जर अभिलेखावरील पुराव्यावरून असे सूचित होते की आरोपीने त्याच्या खाजगी बचावाच्या अधिकाराचा वापर करताना मृत व्यक्तीला जखमा केल्या असतील तर आरोपीचा अपराध ठरवताना न्यायालय अशा बचावाचा नक्कीच विचार करू शकते. तथापि, एखाद्या साक्षीदारास सूचनेच्या स्वरूपात एखादा विशिष्ट प्रश्न विचारला गेला असेल जो खाजगी संरक्षणाच्या अधिकाराचा वापर केल्याचे दर्शवेल तर न्यायालयाकडून अशा सूचना विचारात घेतल्या जाणे हे सुसमर्थनीय होईल आणि जर आरोपीची उपस्थिती सिद्ध झाली तर ती सूचना पुराव्यामध्ये विचारात घेणे निश्चितच अनुज्ञेय असेल.

<u>**रेस जेस्टेटचे (एकाच घडामोडीचा भाग असणाऱ्या तथ्यांच्या संबधतेचे) तत्व**</u>

४६. आम्ही अभिलेखावरील पुराव्यांवरून समोर आलेल्या प्रकरणाच्या दुसऱ्या पैलूची देखील दखल घेतली आहे. स. सा. क्र. ३ नासिर रज्जाक खान यांनी त्यांच्या तोंडी साक्षीत (प्रदर्शित १०) अशी साक्ष दिली आहे की रात्री ११:३० वाजण्याच्या सुमारास त्यांनी १०-१५ मुलांना "साई कार

ऑटो कन्सल्टंट" नावाच्या दुकानासमोर एकमेकांशी भांडताना पाहिले. त्यांनी पुढे अशी साक्ष दिली आहे की, त्यावेळी स.सा क्र.१ असगर शेख हा आला आणि त्याच्या डोक्याला व हाताला दुखापत झाल्याचे सांगितले. असगर शेख याने नासिरला असेही सांगितले की तो फिरोज (स.सा. क्र. २) सोबत पोलिस ठाण्यात जात आहे. असगरने पुढे नासिरला असेही सांगितले की अब्बास बेग हा गंभीर जखमी झाला आहे. असगरकडून माहिती मिळाल्यवर स. सा. क्र. ३ नासिर हा घटनास्थळावर गेला जेथे अब्बास (मयत) हा जखमी अवस्थेत पडला होता. हे लक्षात घेण्यासारखे आहे की स.सा.क्र. ३ नासिरच्या उलटतपासणीमध्ये त्याला एक सूचना देण्यात आली होती की त्याने स.सा.क्र. १ असगर शेख यांच्याकडे काय घडले याची चौकशी केली होती आणि त्याच्या उत्तरादाखल असगर शेखने नासिरला घडलेला प्रकार सांगितला. बचाव पक्षाच्या वकिलांनी स.सा.क्र. ३ नासिर यांना केलेल्या या सूचनेला होकारार्थी उत्तर देण्यात आले. स.सा. क्र.३ नासिरच्या पुराव्यामधील ह्या भागाची पुष्टी स. सा. क्र. १ असगर शेखच्या साक्षीपुराव्यामधून होते.

४७. उपरोक्त पुराव्याचा संदर्भ देण्याचे कारण म्हणजे, स. सा. क्र. ३ नासिर रज्जाक खान (प्रदर्शित क्र. १०) याला “रेस जेस्टेट” साक्षीदार म्हणून संबोधले जाऊ शकते. “रेस जेस्टेट” चे तत्व अधिनियम १८७२ च्या कलम ६ मध्ये अंतर्भूत केले आहे.

> *“**६. एकाच घडामोडीचा भाग असणाऱ्या तथ्यांची संबद्धता** – जेव्हा काही तथ्य वादामध्ये अंतर्भूत नसली तरी, ही तथ्ये आणि एखादे वादतथ्य ही एकाच घडामोडीचा भाग होऊ शकतील अशा रितीने ती त्या वाद तथ्याशी निगडीत असतात तेव्हा, ती संबद्ध असतात, मग ती एकाच वेळी व स्थळी घडलेली असोत व निरनिराळ्या वेळी व स्थळी घडलेली असोत.”*

४८.	**सुखर विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य,** (१९९९) ९ सुप्रीम कोर्ट केसेस ५०७ मध्ये प्रकाशित, ह्या प्रकरणामध्ये, ह्या न्यायालयाने अधिनियम १८७४ मधील कलम ६ आणि ७ च्या संदर्भात कायद्याची स्थिती लक्षात घेतली.

> *"६. पुरावा कायद्याचे कलम ६ हे सामान्य नियमाला अपवाद आहे ज्या अंतर्गत ऐकीव पुरावा हा ग्राहय ठरतो. परंतु, असा ऐकीव पुरावा कलम ६ मधील तरतूदींच्या अंतर्गत आणण्यासाठी जे सिद्ध करणे आवश्यक आहे ते म्हणजे ते कृत्यांशी जवळजवळ समकालीन असले पाहिजे आणि तेथे वेळेमध्ये अंतर असू नये जेणेकरून खोटा पुरावा तयार करता येईल. म्हणून, "रेस जेस्टेट" चा भाग म्हणून स्वीकृत करण्याची मागणी केलेली विधाने ही प्रश्नाधीन कृत्यांच्या समकालीन असावीत किंवा त्यानंतर लगेचच केलेली असवीत. "विगमोर" लिखित पुरावा अधिनियमामध्ये उपरोक्त नियम हा खालील प्रमाणे नमूद करण्यात आला आहे.----*
>
> *"सध्याच्या अपवादाअंतर्गत [ऐकीव] एखाद े विधान गृहीतकाद्वारे केले जाते, जे वस्तुस्थितीचा पुरावा म्हणून सादर केले जात े (उदाहरणार्थ कार-ब्रेक बसवला गेला किंवा बसवला गेला नाही), आणि एकच अट अशी आहे की, ते उत्स्फूर्तपणे केले गेले असावे, म्हणजे उत्तेजित अवस्थेमुळे*

नैसर्गिकरीत्या स्फुरलेले असावे. आता ही उत्तेजित अवस्था उत्तेजक बाब संपल्यानंतरही कायम राहू शकते. त्यामुळे, उत्तेजक प्रभाव कायम राहीला असे गृहीत धरण्याइतपत वेळेत असेल तर, घटना घडल्यानंतरही प्रतिज्ञापत्र ग्राह्य धरले जाऊ शकते."

७. सरकार यांच्या 'पुरावा' (पंधरावी आवृत्ती) मध्ये अधिनियम १८७२ चे कलम ६ लागू करण्यासंबंधीच्या कायद्याचा सारांश पुढीलप्रमाणे दिला आहे :-

"१. प्रतिज्ञापत्र (घोषणापत्र) (तोंडी किंवा लेखी) हे वाद कृतीशी किंवा त्यासंबंधी असणे आवश्यक आहे. ते केवळ एखाद्या कृतीसंबंधी आहे म्हणून ते ग्राह्य धरले जात नाही. शिवाय, प्रतिज्ञापत्र त्यासोबत असलेल्या वस्तुस्थितीशी संबंधित असले पाहिजे आणि ते ज्या वस्तुस्थितीसंबंधी आहे ती वस्तुस्थिती स्पष्ट केली पाहिजे आणि जोपर्यंत अशी तथ्ये निरंतर असलेल्या व्यवहाराचा भाग नसतात, तेव्हा ते त्यापूर्वीच्या किंवा त्यानंतरच्या स्वतंत्र तथ्यांशी संबंधित नसणे आवश्यक आहे.

२. प्रतिज्ञापत्रे केवळ भूतकाळाचे वर्णन न करता, वस्तुस्थितीशी सुसंगत असणे आवश्यक आहे.

३. प्रतिज्ञापत्र आणि कृत्य एकाच व्यक्तीद्वारे असू शकते किंवा ते वेगवेगळ्या व्यक्तींद्वारे असू शकतात, उदा. पीडित, हल्लेखोर आणि बघ्यांचे प्रतिज्ञापत्र.कट, दंगली यांमध्ये सामायिक उद्देश असलेल्या सर्व संबंधितांची प्रतिज्ञापत्रे ग्राह्य धरली जातात.

४. कृतीचे महत्व स्पष्ट करणे किंवा त्याची पुष्टी करणे किंवा ते समजून घेणे यांसाठी ग्राह्य असले तरी, प्रतिज्ञापत्रे हे नमूद केलेल्या बाबींच्या सत्यतेचा पुरावा नसतात.”

४९. कलम ६ मध्ये अंतर्भूत असलेला नियम सामान्यत: 'रेस गेस्टे' चा नियम म्हणून ओळखला जातो. याचा अर्थ असा की, जेव्हा एखादे तथ्य वादनिविष्ट नसले तरी ते तथ्य आणि एखादे वादतथ्य ही 'एकाच घडामोडीचा भाग होऊ शकतील' अशा रीतीने ते त्या वादतथ्याशी निगडीत असतात तेव्हा ते संबद्ध असते. विशिष्ट विधान एकाच घडामोडीचा भाग होण्यासाठी, विधाने त्या घटनेशी सुसंगत (एकसमयावेच्छेदी) किंवा त्या घटनेच्या दरम्यान किंवा ताबडतोब आधी किंवा नंतर केलेले पुरेसे समकालीन असणे आवश्यक आहे.

५०. या प्रकरणातील वस्तुस्थिती व परिस्थितीनुसार, अब्बास बेग वर जबर हल्ला झाला आणि असगर शेख सुद्धा जखमी झाला या घटनेची स. सा. १ असगर शेख कडून ताबडतोब माहिती मिळाल्याच्या स. सा. ३ नासिर रज्जाक खान याच्या जबाबाची ग्राहयता आणि स. सा. १ असगर शेख याने त्याच्या साक्षीदरम्यान कबूल केलेली घटना या सर्व अधिनियम, १८७२ च्या कलम ६ आणि ७ मधील तरतुदी काटेकोरपणे आकर्षित करतात.

<u>आयपीसीच्या कलम ३०० चा अपवाद क्र. ४</u>

५१. आता आम्ही भादंवि च्या कलम ३०० चा चौथा अपवाद लागू करण्यासंदर्भातील निवेदनावर चर्चा करू. मात्र, या निवेदनावर कार्यवाही करण्यापूर्वी मयताच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करणारे आणि शवविच्छेदन अहवालही तयार करणारे वैद्यकीय अधिकारी, डॉ. श्रीकांत सुरेश चांदेकर यांची तोंडी साक्ष पाहणे उचित ठरेल.

५२. स. सा. ७, डॉ. श्रीकांत यांची नि. १८ येथे असलेल्या सरतपासणी मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :

> *"१. दिनांक ०२.०४.२००१ रोजी मी कर्तव्यावर असताना अब्बास सनाउल्ला* बेग यांचा मृतदेह *खडक पोलिसांनी मरणोत्तर पंचनामा करून शवागारात आणला . त्यानुसार मी त्याच दिवशी सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत शवविच्छेदन केले.*
>
> *२. तपासणीकेल्यावर मला खालील बाह्य जखमा दिसल्या :-*
>
> *१) कापल्याची जखम - डाव्या हातास मनगटापासून ३ सें.मी. लांब आडवी तिरकस आणि पूर्ण रुंद, मनगट आणि बोटाच्या मधल्या भागात स्पष्ट अस्थिभंग दर्शविते ;*
>
> *२) कापल्याची जखम - डाव्या मनगटास वैद्यकीयदृष्ट्या आडवी, तिरकस, ४ x १ से. मी. लांब, कोपरापुढील हाताच्या आतील हाडावर पूर्ण रुंदीचा स्पष्ट अस्थिभंग दर्शविते.*
>
> *३) सरळ खरचटलेले - डाव्या मनगटाच्या पाठी २ से. मी. लांब, आडवे ;*

४) झटापटीत दंडाला किंवा मधल्या आडव्या बाजूस झालेली कापल्याची जखम, ३.५ से. मी. लांब, वैद्यकीयदृष्ट्या त्वचेमध्ये खोलवर अशी टोकाकडे उकललेली ;

५) कापल्याची जखम - उजव्या हाताच्या पाठी आडवी तिरकस मध्यभागाजवळ २.५ से. मी. लांब खोलवर उकललेली;

६) सरळ खरचटलेले - गळ्याच्या हाडाखालील उजव्या भागात ४ से. मी. लांब तिरकस ;

७) सरळ खरचटलेले - खांद्याच्या हाडाच्या मधल्या भागात डावीकडे उभे तिरकस, ५ से. मी. लांब;

८) उजव्या खांद्याच्या मागे खरचटलेले ०.५ x ४ से. मी. तिरकस ;

९) ७.५ x ०.८ ते २.५ से. मी. आकाराची भोसकल्याची जखम, उभी गळपट्टीच्या हाडाच्या बाजूला आणि उजव्या बाजूच्या खाली, मध्यभागी आणि वक्राकार जखम, वरील आणि कोनात स्पष्ट कापलेले, कडा स्पष्ट कापलेल्या, उजव्या वक्षीय पोकळीत उकललेली जखम;

संबंधित अंतर्गत जखमा :- छातीचे स्नायू आणि छातीच्या पोकळीचे अस्तर व फुफ्फुसावरील आच्छादन करणारा पडदा हे संबंधित जखमा दर्शवितात. उजव्या बाजूची २ री बरगडी अंशतः कापलेली आणि उजव्या बाजूच्या ३ ऱ्या बरगडीच्या वरच्या बाजूची कडा स्पष्ट कापलेली दिसते. उजव्या बाजूच्या २ ऱ्या बरगडीच्या स्नायूंमध्ये १ x १.५ x ३ से. मी. आकाराची भोसकल्याची जखम.

फुफ्फुसाच्या उजव्या वरील अवयवांगावर कापलेली जखम दिसते जी, उभी, तिरकस १.२ से.मी. आणि ३.५ से. मी. आकाराची आहे.

उजव्या बाजूस मधील पाळीवर आरपार जखम समोरील बाजूस रक्तवाहिनीकडे जाणारी, ऊतीखाली १.५ से. मी. आकाराची, उकललेली.

उजव्या फुफ्फुसाची धमनी आणि वरची नील रक्तवाहिनी अंशतः कापलेली, धमनी उघडलेली.

उजवी फुफ्फुसाची पोकळी गुठळयांनी रक्ताने भरलेली होती.

माझ्या मते वरील सर्व जखमा मृत्यूपूर्व आणि पुनरुत्पादक होत्या.

डोक्याची आणि पोटाची अंतर्गत तपासणी केली असता, मला कोणतीही जखम आढळली नाही, परंतु अवयव निस्तेज होते. पोटात लगदा असलेला द्रव पदार्थ आहे, ज्याला अपरिचित असा कोणताही गंध नाही.

पोलिसांच्या मागणीनुसार मी गटीकरणासाठी रक्त साठवून ठेवले.

माझ्या मते, अब्बासचा मृत्य ू धक्क्यान े आणि चाक ू भोसकल्यामुळे झालेल्या दुखापतीमुळे झाला.

त्यानुसार मी पी.एम.च्या नोद्व (नोंदी) जारी केल्या आहेत. त्या माझ्या हस्ताक्षरात आहेत आणि त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास नि. १९ अशी निशाणी देण्यात आली आहे.

जखम क्र. ९ आणि तिच्याशी संबंधित अंतर्गत जखमा या सर्वसाधारणपणे मृत्यूस कारणीभूत ठरण्यासाठी पुरेशा होत्या. ती इजा तीक्ष्ण धारदार

शस्त्रांमुळे होऊ शकते. जखम क्रमांक ९ तलवारीमुळे होऊ शकते. आता मला दाखवलेली वस्तू क्र. १७ तीच आहे. जखम क्रमांक १ आणि २ या कापलेल्या जखमा आणि अस्थिभंगाच्या होत्या. जखमा क्रमांक १ ते ८ या वस्तू क्र. १६ कोयता किंवा वस्तू क्र. १७ तलवारीने झालेल्या असणे शक्य आहेत, कारण दोघांना धारदार कडा आहेत.

सुरुवातीला मी तात्पुरता मृत्यू दाखला दिला होता. आता मला दाखवलेले प्रमाणपत्र तेच आहे. त्यावर माझ्या स्वाक्षऱ्या आहेत, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास आता निशाणी २० अशी निशाणी देण्यात आली आहे."

५३. या प्रश्नाचे आकलन करण्यासाठी, भारतीय दंड संहितेच्या कलम ३०० मध्ये दिलेल्या खुनाच्या व्याख्येचा संदर्भ देणे फायदेशीर ठरेल, जे खाली उद्धृत केले आहे:

"३००. हत्या. *-- यात यापुढे वगळलेली प्रकरणे खेरीजकरून एरव्ही, --*

एक :- ज्या कृतीमुळे मृत्यू घडून आला ती कृती मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असेल तर, किंवा

दोन :- जिला अपाय करण्यात आला त्या व्यक्तीचा जीमुळे मृत्यू घडून येणे संभवनीय असल्याची अपराध्याला जाणीव आहे अशी शारीरिक क्षती पोचवण्याच्या उद्देशाने ती कृती केली असेल तर, किंवा

तीन :- ती कृती कोणत्याही व्यक्तीस शारीरिक क्षती पोचवण्याच्या उद्देशाने केलेली असून जी शारीरिक क्षती पोचवण्याचा उद्देश आहे ती मृत्यू घडवून आणण्यास सामान्य नैसर्गिक क्रमानुसार पुरेशी असेल तर, किंवा

चार :- त्या कृतीमुळे मृत्यू घडून येणे किंवा जीमुळे मृत्यू घडून येण्याचा संभव आहे अशी शारीरिक क्षती पोचणे हे सर्वथा संभवनीय आहे इतकी ती भयंकर धोक्याची आहे याबद्दल कृती करणाऱ्या व्यक्तीला जाणीव असेल आणि मृत्यू किंवा पूर्वोक्त अशी क्षती घडण्याचा धोका ओढवून घेण्यास कोणतेही निमित्त नसताना तिने अशी कृती केली असेल तर, सदोष मनुष्यवध हा खून असतो.

उदाहरणे

(क) 'क' हा 'य' ला मारण्याच्या उद्देशाने त्याच्यावर गोळी झाडतो. परिणामी 'य' मरतो. 'क' खून करतो.

(ख) एखाद्या ठोशाने 'य' चा मृत्यू घडून येण्याचा संभव आहे अशा रोगाने तो पछाडलेला आहे हे माहीत असताना 'क' त्याला शारीरिक क्षती पोचवण्याच्या उद्देशाने ठोसा हाणतो . त्या ठोश्यामुळे 'य' मृत्यू पावतो. सामान्य नैसर्गिक क्रमानुसार तो ठोसा एखाद्या धडधाकट प्रकृतीच्या व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्यास पुरेसा नसला तरीही, 'क' हा खुनाबद्दल दोषी आहे. पण जर 'य' हा एखाद्या रोगाने पछाडलेला आहे हे माहीत नसताना 'क' ने सामान्य नैसर्गिक क्रमानुसार ज्यामुळे धडधाकट प्रकृतीच्या व्यक्तीचा मृत्यू घडणार नाही असा ठोसा हाणला आणि अशा बाबतीत मृत्यू किंवा सामान्य नैसर्गिक क्रमानुसार जीमुळे मृत्यू घडून येऊ शकेल अशी शारीरिक क्षती पोचवण्याचा 'क' चा उद्देश नसेल तर, शारीरिक क्षती पोचवण्याचा त्याचा उद्देश असला तरी, तो खुनाबद्दल दोषी होत नाही.

(ग) सामान्य नैसर्गिक क्रमानुसार माणसाचा मृत्यू घडवून आणण्याइतपत पुरेसे होईल अशा प्रकारे, 'क' हा 'य' वर तलवारीचा वार करतो किंवा त्याला दंडुक्याने जखम करतो. परिणामी, 'य' मरण पावतो. या बाबतीत, 'य' चा मृत्यू घडवून आणावा असा 'क' चा उद्देश नसला तरीही, तो खुनाबद्दल दोषी आहे.

(घ) कोणतेही निमित्त नसताना 'क' माणसांच्या समुदायावर भरलेली बंदूक उडवतो व त्यांच्यापैकी एकजण मारला जातो. कोणत्याही विशिष्ट माणसाला मारावे असा 'क' चा पूर्वसंकल्पित बेत नसला तरीही, तो खुनाबद्दल दोषी आहे.

अपवाद १ - गंभीर व आकस्मिक प्रक्षोभ कारणामुळे स्वतःवरचा ताबा सुटला असता अपराधी जर, ज्या व्यक्तीने प्रक्षोभित केले तिच्या मृत्यूस कारणीभूत झाला अथवा चुकीने किंवा अपघाताने अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूस कारणीभूत झाला अथवा चुकीने किंवा अपघाताने अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूस कारणीभूत झाला तर, सदोष मनुष्यवध हा खून होत नाही.

वरील अपवाद हा पुढील परंतुकांना अधीन आहे :-

पहिले - प्रक्षोभ कारण हे अपराध्याने एखाद्या व्यक्तीला ठार मारण्यासाठी किंवा तिला अपाय करण्यासाठी निमित्त म्हणून शोधलेले नसावे किंवा इच्छापूर्वक उकरून काढलेले नसावे.

दुसरे - कायद्याचे पालन म्हणून केलेल्या किंवा एखाद्या लोक सेवकाने असा लोक सेवक म्हणून आपल्या अधिकाराचा कायदेशीर वापर करून केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रक्षोभन झालेले नसावे.

तिसरे - खाजगीरीत्या बचाव करण्याच्या हक्काचा कायदेशीर वापर करताना केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रक्षोभन झालेले नसावे.

स्पष्टीकरण -अपराध हा 'खून' या सदरात न मोडण्याइतपत ते प्रक्षोभ कारण गंभीर व आकस्मिक होते किंवा काय हा तथ्यविषयक प्रश्न आहे.

उदाहरणे

(क) *'य ' ने प्रक्षोभित केल्यामुळे संतप्त होऊन क्रोधाच्या भरात 'क' हा 'य' चे मूल 'म' याला उद्देशपूर्वक ठार मारतो. हा खून आहे, कारण मुलाने प्रक्षोभित केलेले नाही व प्रक्षोभनामुळे उद्भवलेले कृत्य करताना अपघाताने किंवा दुर्दैवाने मुलाचा मृत्यू घडून आलेला नाही.*

(ख) *'म' हा 'क' ला गंभीर व आकस्मिक कारणाने प्रक्षोभित करतो. 'क' या प्रक्षोभनामुळे 'म' वर पिस्तुल झाडतो व त्याच्या जवळपास असलेल्या पण नजरेच्या टप्प्याबाहेर असलेल्या 'य' ला मारण्याचा त्याचा उद्देश नसताना, तसेच आपल्या हातून तो मारला जाण्याचा संभव आहे याचीही जाणीव नसताना त्याच्याकडून 'य' मारला जातो. या बाबतीत 'क' ने खून केलेला नाही, पण फक्त सदोष मनुष्यवध केलेला आहे.*

(ग) 'क' ला 'य' या बेलिफाकडून कायदेशीरपणे अटक झालेली आहे. 'क' अटकेमुळे आकस्मिकपणे व क्रोधावेगाने संतप्त होऊन 'य' ला ठार मारतो. हा खून आहे, कारण लोक सेवकाने आपल्या अधिकारांचा वापर करताना केलेल्या गोष्टींमुळे प्रक्षोभन झाले होते.

(घ) 'क' हा 'य' ह्या दंडाधिकाऱ्यापुढे साक्षीदार म्हणून उपस्थित होतो. 'य' असे म्हणतो की, "'क' च्या जबानीतील कोणत्याही शब्दावर माझा विश्वास नाही व 'क' ने शपथेवर खोटी साक्ष दिली आहे." या शब्दामुळे 'क' ला आकस्मिकपणे चीड येऊन तो 'य' ला ठार मारतो. हा खून आहे.

(ङ.) 'क' हा 'य' चे नाक ओढण्याचा प्रयत्न करतो, तसे करण्यास त्याला प्रतिबंध करण्यासाठी 'य' खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क वापरुन 'क' ला पकडीत धरतो. परिणामी, आकस्मिकपणे 'क' ला क्रोधावेग येऊन तो 'य' ला ठार मारतो. हा खून आहे, कारण खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क बजावत असताना केलेल्या गोष्टीमुळे प्रक्षोभन झाले होते.

(च्) 'य' हा 'ब' ला तडाखा हाणतो, या प्रक्षोभकारणामुळे 'ख' ला भयंकर संताप येतो. बाजूला उभा असलेला 'क' हा 'ख' च्या संतापाचा फायदा घेऊन त्याच्याकरवी 'य' ला ठार मारण्याच्या उद्देशाने, त्यासाठी 'ख' च्या हातात चाकू देतो. 'ख' हा 'य' ला चाकूने भोसकून ठार मारतो. या बाबतीत, 'ख' ने फक्त सदोष मनुष्यवध केला असेल, पण 'क' हा खुनाबद्दल दोषी आहे.

अपवाद २ - शरीराचा किंवा मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क सद्भावपूर्वक बजावत असताना जर अपराध्याने आपणांस कायद्याने दिलेल्या अधिकाराचा अतिक्रम केला व जिच्याविरुद्ध तो असा बाचावाचा हक्क बजावत आहे तिच्या मृत्यूस तो, तसे पूर्वनियोजित नसताना व अशा बचावासाठी आवश्यक असेल त्याहून अधिक अपाय करण्याचा उद्देश नसताना कारणीभूत झाला तर, सदोष मनुष्यवध हा खून होत नाही.

उदाहरण:

`झेड' `ए' घोड्याला चाबूक मारण्याचा प्रयत्न करतो, `ए' ला गंभीर दुखापत होईल अशा प्रकारे नाही. `ए' पिस्तूल काढतो. झेड प्राणघातक हल्ल्यात कायम आहे. तो इतर कोणत्याही प्रकारे स्वत:ला घोड्याच्या चाबकाने मारण्यापासून रोखू शकत नाही या सद्भभावनेवर विश्वास ठेवून, झेडचा मृत्यू झाला.` ए' ने खून केला नाही, तर केवळ दोषी हत्या केली आहे.

अपवाद ३.— सार्वजनिक न्यायाच्या अभिवृद्धीकरता कार्य करणारा असा लोक सेवक म्हणून किंवा अशा लोकसेवकाला साहाय्य करत असताना जर अपराध्यांने आपणास कायद्याने दिलेल्या अधिकारांचा अतिक्रम केला आणि जी कृती कायदेशीर व असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य यथायोग्यपणे पार पाडण्यासाठी आवश्यक आहे असे तो सद्भाभावपूर्वक समजतो ती कृती केल्याने तो एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूस, तिच्या विषयी द्दष्टभाव नसताना कारणीभूत झाला तर, सदोष मनुष्यवध हा खून नाही.

अपवाद ४.— आकस्मिक भांडणातून संतापाच्या भरात आकस्मिकपणे, मारामारी सुरु झाली असता पूर्वनियोजित नसताना व अपराध्याने गैरफायदा घेतलेला नसताना किंवा तो क्रूरपणे व अवाजवी रीतीने वागलेला नसताना सदोष मनुष्यवध झाला तर, तो खून होत नाही.

स्पष्टीकरण.—अशा प्रकरणांमध्ये कोणता पक्ष चिथावणी देतो किंवा पहिला हल्ला करतो हे महत्त्वाचं नाही.

अपवाद :-५ जिचा मृत्यू घडून आला तो व्यक्ती अठरा वर्षावरील वयाची असून तिने स्वतःच्या संमतीने मृत्यू पत्करला असेल किंवा मृत्यूचा धोका पत्करला असेल तर, सदोष मनुष्यवध हा खून होत नाही.

उदाहरण*:-*

`ए', चिथावणी देऊन, स्वेच्छेने, `झेड', अठरा वर्षांखालील व्यक्तीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करते. येथे, `झेड' च्या अज्ञानपणामुळे, तो स्वतःच्या मृत्यूला संमती देण्यास असमर्थ होता; त्यामुळे `ए' ने हत्येला प्रोत्साहन दिले आहे."

५४. या टप्प्यावर, आंध्र प्रदेश राज्य विरुद्ध रायवरापू पुन्नय्या आणि (१९७६) ४ एससीसी ३८२ मधील आणखी एका अहवालात या न्यायालयाच्या खालील निरीक्षणांचा संदर्भ घेणे फायदेशीर ठरेल, जिथे या न्यायालयाने खून आणि सदोष मनुष्यवध यांच्यातील फरक अनुवर्ती पद्धतीने स्पष्ट केला आहे

“१२. दंड संहितेच्या योजनेत , "दोषी हत्या" ही जात आणि "हत्या" ही त्याची प्रजाती आहे. सर्व "हत्या" हे "दोषी हत्या" आहे परंतु दुर्गुण नाही. उलट सर्वसाधारणपणे बोलायचे झाल्यास, "हत्याची विशेष वैशिष्ठ्ये" शिवाय "दोषी हत्या" म्हणजे "हत्येचे प्रमाण नसून अपराधी हत्या" आहे. या सामान्य गुन्ह्याच्या गंभीरतेच्या प्रमाणात, शिक्षा निश्चित करण्याच्या उद्देशाने, संहिता व्यावहारिकरित्या दोषी हत्याकांडाच्या तीन प्रमाणांना मान्यता देते. पहिला, ज्याला म्हटले जाऊ शकते, "प्रथम दर्जाचा दोषी मनुष्यवध". हा अपराधी हत्येचा सर्वात मोठा प्रकार आहे, ज्याची व्याख्या कलम ३०० मध्ये "हत्या" अशी केली आहे. दुसऱ्याला "दुसऱ्या दर्जाचा दोषी मनुष्यवध" असे म्हटले जाऊ शकते. कलम ३०४ च्या पहिल्या भागानुसार हे दंडनीय आहे. त्यानंतर, "तिसऱ्या दर्जाचा दोषी मनुष्यवध" आहे. हा सर्वात कमी प्रकारचा अपराधी हत्येचा प्रकार आहे आणि त्यासाठी दिलेली शिक्षा देखील, तीन दर्जासाठी केलेल्या शिक्षेपैकी सर्वात कमी आहे. कलम ३०४ च्या दुसऱ्या भागांतर्गत या प्रमाणाचा दोषी मनुष्यवध दंडनीय आहे .

१३. "हत्या" आणि "हत्येचा दर्जा नसलेला दोषी मनुष्यवध" यामधील अध्ययन विषयक फरकाने एका शतकाहून अधिक काळ न्यायालयांसमोर हा अडचणींचा प्रश्न झाला होता. असा संभ्रम निर्माण होतो की, जर न्यायालये या विभागांमध्ये कायदेमंडळाने वापरलेल्या अटींचा खरा व्याप्ती आणि अर्थ गमावत असतील तर, स्वतःला सूक्ष्म गोषवारामध्ये काढण्याची परवानगी देतात. कलम २९९ आणि ३०० च्या विविध कलमांमध्ये वापरल्या

जाणाऱ्या मुख्य शब्दांवर लक्ष केंद्रित करणे हा या तरतुदींचा अर्थ लावण्यासाठी आणि लागू करण्याचा सर्वात सुरक्षित मार्ग आहे. खालील तुलनात्मक सारणी दोन गुन्ह्यांमधील फरकाच्या मुद्द्यांचे कौतुक करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

कलम २९९	कलम ३००
ज्या कृत्यामुळे मृत्यू झाला असेल तर एखादी व्यक्ती दोषी हत्या करते.	काही अपवादांच्या अधीन राहून ज्या कृत्यामुळे मृत्यू झाला असेल तर तो खून आहे -
हेतू	
(a) मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने: किंवा (b) अशा शारीरिक इजा करण्याच्या उद्देशाने ज्यामुळे मृत्यू होण्याची शक्यता आहे;	(अ) मृत्यू घडवण्याच्या उद्देशाने; किंवा (२) ज्या व्यक्तीला हानी पोहोचली आहे त्या व्यक्तीचा मृत्यू होण्याची शक्यता गुन्हेगाराला माहीत असल्याने अशी शारीरिक इजा करण्याच्या उद्देशाने; किंवा
ज्ञान	

(*c*) या कृत्यामुळे मृत्यू होण्याची शक्यता आहे हे जाणून,	(३) ही कृती इतकी घनिष्ठपणे धोकादायक आहे की ती सर्व संभाव्यतेने मृत्यूस कारणीभूत ठरली पाहिजे किंवा वर नमूद केल्याप्रमाणे मृत्यू किंवा अशा इजा होण्याच्या जोखमीसाठी कोणत्याही कारणाशिवाय आणि संभाव्यतेनुसार मृत्यूला कारणीभूत ठरेल.

१४. कलम २९९ चे खंड (बी) कलम ३०० च्या कलम (२) आणि (३) शी संबंधित आहेत . खंड (२) अंतर्गत आवश्यक असलेल्या अपराधी आणि पापी मनाचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे विशिष्ट पीडित व्यक्ती अशा विचित्र स्थितीत किंवा आरोग्याच्या स्थितीत असल्याबद्दल गुन्हेगाराकडे असलेले ज्ञान हे आहे की, वस्तुस्थिती असूनही, त्याला झालेली अंतर्गत हानी घातक ठरू शकते. अशी हानी निसर्गाच्या सामान्य मार्गाने सामान्य आरोग्य किंवा स्थितीत असलेल्या व्यक्तीच्या मृत्यूस कारणीभूत ठरणार नाही. हे लक्षात घेण्याजोगे आहे की "मृत्यू घडवण्याचा हेतू" ही कलम (२) ची अनिवार्य आवश्यकता नाही. केवळ शारिरीक दुखापत घडवून आणण्याचा हेतू आणि गुन्हेगाराला अशा दुखापतीमुळे विशिष्ट पीडित व्यक्तीचा मृत्यू होण्याची शक्यता माहीत असणे, ही हत्या या कलमाच्या कक्षेत आणण्यासाठी पुरेशी

आहे. कलम (२) ची ही बाजू कलम ३०० ला जोडलेल्या चित्रण (ब) द्वारे दर्शविली जाते.

१५. कलम २९९ च्या खंड (ब) मध्ये गुन्हेगाराला असे कोणतेही ज्ञान दिलेले नाही. कलम ३०० च्या कलम (२) अंतर्गत येणाऱ्या घटनांमध्ये असे होऊ शकते की हल्लेखोराला हे माहित असताना सुद्धा की पीडित व्यक्तीचे यकृत, किंवा प्लीहा वाढलेल्या आहेत किंवा रोगग्रस्त हृदय आहे आणि अशा आघातामुळे यकृत किंवा प्लीहा फुटल्यामुळे तसेच ह्दय चालण्याचे थांबल्यामुळे त्या विशिष्ट व्यक्तीचा मृत्यू होण्याची शक्यता असते, त्याने मुद्दमपणे पीडित व्यक्तीला मुठीने ठोसे मारलेले असू शकतात. जर हल्लेखोराला त्या आजाराबद्दल किंवा पीडितेच्या विशेष दुर्बलतेबद्दल अशी कोणतीही माहिती नसेल किंवा मृत्यूला कारणीभूत ठरण्याइतपत शारीरिक इजा करण्याचा हेतू नसेल, तर मृत्यूस कारणीभूत ठरणारी जखम मुद्दाम दिली गेली असली तरी गुन्हा खून होणार नाही.

१६. कलम ३०० च्या खंड (३) मध्ये कलम २९९ च्या संबंधित खंड (ब) मधील "मृत्यूस कारणीभूत ठरण्याची शक्यता" या शब्दांऐवजी "निसर्गाच्या सामान्य प्रक्रियेत पुरेसे" हे शब्द वापरले गेले आहेत. साहजिकच मृत्यूला कारणीभूत ठरणारी शारीरिक इजा आणि मृत्यूला कारणीभूत ठरण्यासाठी निसर्गाच्या सामान्य प्रवाहात पुरेशी शारीरिक इजा यात फरक आहे. हा फरक ठीक आहे, पण खरा आहे आणि त्याकडे दुर्लक्ष केल्यास न्यायाची पायमल्ली होऊ शकते. कलम २९९ चे खंड (ब) आणि कलम ३०० चे खंड

(३) यांच्यातील फरक हा इच्छित शारीरिक दुखापतीमुळे मृत्यूच्या संभाव्यतेचे एक प्रमाण आहे. थोडक्यात सांगायचे झाले तर सदोष मनुष्यवध हा सर्वात गंभीर, मध्यम किंवा सर्वात खालच्या दर्जाचा आहे की नाही हे मृत्यूच्या संभाव्यतेच्या प्रमाणावरून ठरवले जाते. कलम २९९ च्या खंड (ब) मधील "संभाव्य" हा शब्द "संभाव्य" या अर्थाने निव्वळ शक्यते पासून विभक्त आहे. "शारीरिक दुखापत ... मृत्यूला कारणीभूत ठरण्यासाठी निसर्गाच्या सामान्य प्रक्रिया पुरेशी" या शब्दांचा अर्थ असा आहे की निसर्गाच्या सामान्य प्रक्रियेचा विचार करता, मृत्यू हा दुखापतीचा "सर्वात संभाव्य" परिणाम असेल.

१७. प्रकरणे खंड (३) मध्ये येण्यासाठी, अपराध्याचा मृत्यू घडवून आणण्याचा हेतू आहे हे आवश्यक नाही, जोपर्यंत जाणीवपूर्वक शारीरिक दुखापत किंवा जखमांमुळे मृत्यू होतो तोपर्यंत निसर्गाच्या सामान्य प्रक्रियेत मृत्यू होऊ शकतो. राजवंत वि. केरळ राज्य [ए आय आर १९६६ एस सी १८७४ : १९६६ पुरवणी एससीआर २३० : १९६६ क्रि एल जे १५०९.] हे या मुद्द्याचे योग्य उदाहरण आहे.

१८. विरसा सिंग विरुद्ध पंजाब राज्य [ए आय आर १९५८ एस सी ४६५ : १९५८ एससीआर १४९५ : १९९८ क्रि एल जे ८१८.] विवियन बोस, जे. या न्यायालयातर्फे बोलतांना, खंड (३) चा अर्थ आणि व्याप्ती स्पष्ट केली, अशा प्रकारे (येथे पृ. १५००):

“ कलम ३०० अंतर्गत खटला दाखल करण्यापूर्वी फिर्यादीने खालील तथ्ये सिद्ध करणे आवश्यक आहे, 'तिसरे'. प्रथम, त्याने वस्तुनिष्ठपणे हे स्थापित केले पाहिजे की शारीरिक इजा आहे; दुसरे म्हणजे दुखापतीचे स्वरूप सिद्ध करणे आवश्यक आहे. हा निव्वळ वस्तुनिष्ठ तपास आहेत. हे सिद्ध करणे आवश्यक आहे की ती विशिष्ट इजा पोहोचवण्याचा हेतू होता, म्हणजेच ते अपघाती किंवा अनावधानाने नव्हते किंवा इतर काही प्रकारची इजा करण्याचा हेतू होता. एकदा हे तीन घटक उपस्थित असल्याचे सिद्ध झाल्यावर, चौकशी पुढे जाते आणि चौथे असे सिद्ध केले पाहिजे की वर वर्णन केलेल्या तीन घटकांनी बनवलेल्या प्रकारची जखम ही सामान्य निसर्गात मृत्यूला कारणीभूत ठरण्यासाठी पुरेशी होती. चौकशीचा हा भाग पूर्णपणे वस्तुनिष्ठ आणि अनुमानात्मक आहे आणि गुन्हेगाराच्या हेतूशी त्याचा काहीही संबंध नाही.”

१९. अशाप्रकारे, विरसा सिंग प्रकरणात घालून दिलेल्या नियमानुसार जरी आरोपीचा हेतू सामान्य स्वभावात मृत्यूला कारणीभूत ठरण्याइतपत शारीरिक इजा करण्यापुरता मर्यादित असला, आणि मृत्यू घडवून आणण्याच्या हेतूपर्यंत वाढवला नसला तरी, गुन्हा "हत्या" असेल. कलम ३०० मध्ये जोडलेले उदाहरण (सी) स्पष्टपणे हा मुद्दा समोर आणते.

२०. कलम २९९ चे खंड (सी) आणि कलम ३०० चे कलम (४) या दोघांना मृत्यू होण्याच्या कृतीच्या संभाव्यतेचे ज्ञान आवश्यक आहे. या प्रकरणाच्या उद्देशाने या संबंधित कलमांमधील फरकावर जास्त विस्तार करणे आवश्यक

नाही. कलम ३०० चे कलम (४) असे म्हणणे पुरेसे ठरेल एखाद्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या मृत्यूच्या संभाव्यतेबद्दल गुन्हेगाराचे ज्ञान - एखाद्या विशिष्ट व्यक्ती किंवा व्यक्तींपासून वेगळे केल्याप्रमाणे - त्याच्या निकटवर्तीय धोकादायक कृत्यामुळे, व्यावहारिक निश्चिततेच्या अंदाजे, त्याबद्दलचे ज्ञान लागू होईल. गुन्हेगाराच्या बाजूने असे ज्ञान उच्च संभाव्यतेचे असणे आवश्यक आहे, अपराध्याने वरीलप्रमाणे मृत्यू किंवा इजा होण्याच्या जोखमीची कोणतीही सबब न देता केलेले कृत्य.

२१. वरील मतावरून असे दिसून येते की, जेव्हा जेव्हा एखाद्या खटल्यातील तथ्यांनुसार गुन्हा "हत्या" आहे की "दोषी हत्या" असा प्रश्न न्यायालयाला भेडसावतो, तेव्हा हे सोयीचे होईल की सदरच्या प्रश्नाचा विचार तीन टप्प्यात करावा, पहिल्या टप्प्यावर विचार केला जाणारा प्रश्न हा असेल की, आरोपीने एखादे कृत्य केले आहे का, ज्यामुळे त्याने दुसऱ्याचा मृत्यू झाला. आरोपीची कृती आणि मृत्यू यांच्यातील अशा कारणात्मक संबंधाचा पुरावा, कलम २९९ मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे आरोपीचे कृत्य "दोषी हत्या" आहे की नाही याचा विचार करण्यासाठी दुसरा टप्पा जातो. या प्रश्नाचे उत्तर प्रथमदर्शनी होकारार्थी मिळाल्यास दंड संहितेच्या कलम ३०० च्या अंमलबजावणीचा विचार करण्याची स्थिती निर्माण होते. या टप्प्यावर सरकारी पक्षाने सिद्ध केलेली तथ्ये हे प्रकरण कलम ३०० मधील "हत्या" व्याख्येच्या चार कलमांपैकी कोणत्याही कलमाच्या कक्षेत आणतात की नाही हे न्यायालयाने ठरवावे. जर या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी असेल तर तो

गुन्हा "सदोष मनुष्यवध" असेल, जो कलम २९९ चे दुसरे किंवा तिसरे कलम लागू आहे की नाही यावर अवलंबून अनुक्रमे कलम ३०४ च्या पहिल्या किंवा दुसऱ्या भागानुसार दंडनीय असेल. जर हा प्रश्न सकारात्मक आढळला, परंतु हे प्रकरण कलम ३०० मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अपवादात आले तर तो गुन्हा "सदोष मनुष्यवध" असेल, जो दंड संहितेच्या कलम ३०४ च्या पहिल्या नुसार दंडनीय असेल.

५५. वरील तत्त्वे आपल्यासमोर असलेल्या खटल्याला लागू केल्यास आम्हाला आढळून येते की मृत व्यक्तीचा मृत्यू हा अपघात किंवा आत्महत्येमुळे झाला नसून दोषी हत्या मुळे झाला आहे. म्हणून, सादर घटना संहितेच्या कलम ३०० मध्ये दर्शविलेल्या कोणत्याही अपवादामध्ये येते का याचा विचार करण्याचा आमचा उद्देश आहे .

५६. प्रकरण चौथ्या अपवादात आणण्यासाठी, (२००४) ११ एस सी सी ३८१ मध्ये नोंदवलेले प्रकाश चंद विरुद्ध हिमाचल प्रदेश राज्य या प्रकरणात या न्यायालयाने निदर्शनास आणलेली आवश्यक आवश्यकता खालीलप्रमाणे आहे:

“ भा. द. वि. सं. कलम ३०० चा चौथा अपवाद मध्ये अचानक झालेल्या भांडणात केलेल्या कृत्यांचा समावेश होतो. हा अपवाद पहिल्या अपवादामध्ये समाविष्ट नसलेल्या चिथावणीच्या प्रकरणाशी संबंधित आहे, त्यानंतर त्याचे स्थान अधिक योग्य ठरले असते. अपवाद एकाच तत्त्वावर आधारित आहे, कारण दोन्हीमध्ये पूर्वचिंतनाचा अभाव आहे. परंतु, अपवाद १ च्या बाबतीत आत्म-नियंत्रणाची संपूर्ण वंचितता आहे, अपवाद ४ च्या बाबतीत, केवळ भावनेची उत्कटता जी पुरुषांना विवेकहीन करून

टाकते आणि त्यांना अशा कृती करण्यास उद्युक्त करते जे ते अन्यथा करणार नाहीत. अपवाद १ प्रमाणे अपवाद ४ मध्ये चिथावणी आहे; परंतु झालेली इजा हा त्या चिथावणीचा थेट परिणाम नाही. खरं तर, अपवाद ४ अशा प्रकरणांशी संबंधित आहे ज्यात धक्का बसला असला तरीही, किंवा विवादाच्या उत्पत्तीमध्ये दिलेली काही चिथावणी किंवा भांडण कोणत्याही प्रकारे उद्भवले असेल, तरीही दोन्ही पक्षांचे त्यानंतरचे आचरण त्यांना समान पातळीवर दोषी ठरवते. "अचानक लढा" म्हणजे परस्पर चिथावणी देणे आणि प्रत्येक बाजूला हल्ला करणे. त्यानंतर केलेली हत्येमध्ये कोणत्या बाजूने चिथावणी दिली गेली हे स्पष्टपणे शोधात येत नाही किंवा अशा प्रकरणांमध्ये संपूर्ण दोष एका बाजूला ठेवता येत नाही. कारण तसे असल्यास, अपवाद १ अधिक योग्यरित्या लागू होईल. त्यानंतर केलेली हत्या ही एकतर्फी चिथावणीसाठी स्पष्टपणे शोधात येत नाही किंवा अशा प्रकरणांमध्ये संपूर्ण दोष एका बाजूला ठेवता येत नाही. आकस्मिक भांडण होते आणि त्यासाठी दोन्ही पक्षांना कमी अधिक प्रमाणात जबाबदार धरले जाते. कदाचित त्यांच्यापैकी एकाने ते सुरू केले असेल. परंतु जर दुसऱ्याने स्वतःच्या वर्तनाद्वारे ते अधिक विकोपास नेले नसते तर, त्या भांडणाने गंभीर वळण घेतले नसते. त्यानंतर आपसांत प्रक्षोभन आणि वाढ होते आणि प्रत्येक भांडण करणाऱ्या व्यक्तीमध्ये दोष विभागणे अवघड असते. जर मृत्यू खालील कारणांमुळे झाला तर अपवाद ४ ची मदत घेता येऊ शकते - (अ) पूर्व नियोजन न करता ; (ब) आकस्मिकपणे झालेल्या भांडणामुळे ;

(क) अपराध्याने गैरफायदा न घेता किंवा क्रूरपणे किंवा अवाजवी पद्धतीने वागल्याने ; आणि (ड) मरण पावलेल्या व्यक्तीशी भांडण झाले असले पाहिजे. एखादे प्रकरण अपवाद ४ अंतर्गत येण्यासाठी, त्यात नमूद केलेले सर्व घटक त्यात आढळणे आवश्यक आहे. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, भादंसं च्या कलम ३०० च्या अपवाद ४ मध्ये आढळणाऱ्या 'भांडण' या शब्दाची व्याख्या भारतीय दंड संहितेमध्ये दिलेली नाही. भांडण करण्यासाठी दोन व्यक्तींची आवश्यकता असते. संतापाच्या भरात म्हणजे असा संताप शांत होण्यासाठी वेळ नसला पाहिजे आणि या प्रकरणात, सुरुवातीस झालेल्या तोंडी बाचाबाची मधून पक्षकारांचा संताप भडकला होता. भांडण म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये शस्त्रांसह किंवा शस्त्रांशिवाय झालेली लढाई होय. आकस्मिक भांडण कशास मानता येईल याबाबतीत कोणताही सर्वसाधारण नियम असल्याचे स्पष्ट प्रतिपादन करणे शक्य नाही. हा तथ्याचा प्रश्न आहे आणि एखादे भांडण आकस्मिक आहे किंवा नाही हे, प्रत्येक प्रकरणातील सिद्ध झालेल्या तथ्यांवर अवलंबून असणे आवश्यक आहे. अपवाद ४ लागू करण्याकरिता आकस्मिक भांडण झाले आणि ते पूर्वनियोजित नव्हते हे दर्शवणे पुरेसे नाही. त्यातून हे सुद्धा पुढे दर्शविणे आवश्यक आहे की, अपराध्याने कोणताही गैरफायदा घेतला नव्हता किंवा तो क्रूरपणे किंवा अवाजवी रीतीने वागला नव्हता. तरतुदींमध्ये वापरण्यात आलेल्या 'गैरफायदा' या शब्दाचा अर्थ अनुचित फायदा असा आहे." (यावर भर देण्यात आला आहे.)

५७.	अशा प्रकारे नेहमीच कलम ३०० चा अपवाद विनाकारण लागू करणे म्हणजेच ते खुनाचे प्रकरण आहे पण ते कलम लागू न होण्यासाठी आणि ते खुनाऐवजी सदोष मनुष्यवधाचे प्रकरण होण्यासाठी, आरोपीने अपवादाच्या लाभाच्या दावा केला आहे. म्हणून आम्ही हे गृहीत धरणे आवश्यक आहे की, हे खुनाचे प्रकरण होते आणि अपवाद लागू होतो हे आरोपीने दर्शविले पाहिजे. अपवाद ४ खालील प्रमाणे आहे -

> *"अपवाद ४ - आकस्मिक भांडणातून संतापाच्या भरात आकस्मिकपणे मारामारी सुरू झाली असता पूर्वनियोजित नसताना व अपराध्याने गैरफायदा घेतलेला नसताना किंवा तो क्रूरपणे व अवाजवी रीतीने वागलेला नसताना सदोष मनुष्यवध झाला तर, तो खून होत नाही."*

५८.	तरतुदींचे अवलोकन करता हे स्पष्ट होते की, अपवाद ४ च्या अंतर्गत एखादे प्रकरण येण्यासाठी चार अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे :-

(i) आकस्मिक भांडण झाले होते ;

(ii) ते पूर्वनियोजित नव्हते ;

(iii) संतापाच्या भरात ती कृती केली होती ; आणि

(iv) अपराध्याने गैरफायदा घेतला नव्हता किंवा तो क्रूरपणे किंवा अवाजवी रीतीने वागला नव्हता.

५९.	अपवाद ४ चे सरळ वाचन केले असता असे दिसते की, जर मृत्यू खालील कारणांमुळे झाला तर अपवाद ४ लागू करता येऊ शकतो - (अ) पूर्वनियोजित नसताना, (ब) आकस्मिक झालेल्या भांडणातून, (क) अपराध्याने गैरफायदा घेतलेला नसताना किंवा तो क्रूरपणे किंवा अवाजवी रीतीने वागलेला नसताना (ड) भांडणामुळे व्यक्ती मरण पावला असताना. एखादे प्रकरण अपवाद ४ च्या अर्थांतर्गत येण्यासाठी त्यात नमूद केलेले सर्व घटक त्यात असणे आवश्यक आहे.

६०.	मयताचे शवविच्छेदन केलेल्या स. सा. ७ डॉक्टर श्रीकांत यांच्या साक्षीवरून स्पष्ट झालेल्या, मयतास झालेल्या जखमांच्या प्रमाणाची आम्ही या आधीच दखल घेतली आहे. कोयता आणि तलवारी सारख्या धोकादायक शस्त्रांनी शरीराच्या महत्त्वाच्या भागावर केलेल्या जखमांचे स्वरूप लक्षात घेता, हे प्रकरण भादंसं च्या कलम ३०२ खालील आहे, या निष्कर्षापासून कोणतीही सुटका होऊ शकत नाही.

६१.	हे प्रकरण भादंसं च्या कलम ३०० च्या अपवाद ४ अंतर्गत येते आणि म्हणून असा फायदा आरोपीला देण्यात यावा, हे अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी केलेले निवेदन स्वीकारणे आमच्यासाठी खूप अवघड आहे. सदर घटना एका क्षणात घडली होती आणि भांडण सुद्धा आकस्मिकरीत्या झाले होते हे जरी क्षणभरासाठी गृहीत धरले, तरीही निःशस्त्र आणि हतबल असलेल्या मयत व्यक्तीवर अपीलकर्त्यांनी धोकादायक शस्त्राने तब्बल ९ वार केले, ही बाब आम्ही नजरेआड करू शकत नाही. एखादे प्रकरण भादंसं च्या कलम ३०० च्या खंड (३) अंतर्गत येण्याकरिता, सर्वसाधारण परिस्थितीत मृत्यू येण्यासाठी जाणून बुजून केलेली शारीरिक जखम किंवा जखमांमुळे जेव्हा मृत्यू होतो, तेव्हा अपराध्याचा मृत्यू घडवण्याचा हेतू होता हे आवश्यक नाही. एआयआर १९६६ एससी १८७४ मध्ये प्रसिद्ध झालेले **रजवंत सिंग विरुद्ध केरळ राज्य** हे प्रकरण या मुद्द्याचे योग्य उदाहरण आहे.

६२.	या प्रकरणाच्या एकंदर दृष्टिकोनातून, उच्च न्यायालयाचा आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश यांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी अपीलकर्त्यांनी प्रकरण सिद्ध केलेले नाही याची आम्हाला खात्री झाली आहे.

६३.	परिणामी, हे अपील यशस्वी ठरते आणि अशा प्रकारे फेटाळण्यात येत आहे.

६४. अभिलेखांवरून असे दिसून येते की, प्रस्तुत अपिलाची अंतिम सुनावणी होईपर्यंत यातील दोन्ही अपीलकर्त्यांची जामीनावर मुक्तता करण्याचे आदेश देण्यात आले होते. दिनांक ०१.१०.२०१० रोजीच्या आदेशाद्वारे अपीलकर्ता क्र. २ यास जामिनावर मुक्त करण्याचे आदेश देण्यात आले होते आणि दिनांक ०४.०३.२०१३ रोजीच्या आदेशाद्वारे यातील अपीलकर्ता क्र. १ यास जामिनावर मुक्त करण्याचे आदेश देण्यात आले होते. सत्र प्रकरण ३२३/२००१ मध्ये अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे यांचे समाधान होईल याकरिता सादर करण्यात आलेली जमानत पत्रे रद्द करण्यात येत आहेत. आजपासून दोन आठवड्यांच्या कालावधीत दोन्ही अपीलकर्त्यांनी न्यायचौकशी न्यायालयासमोर शरण येण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

६५. अपीलकर्त्यांनी न्यायचौकशी न्यायालयासमोर शरणागती पत्करल्यानंतर त्यांना ठोठावण्यात आलेली शिक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवावे.

६६. प्रलंबित अर्ज असल्यास, ते निकाली काढण्यात आले आहेत.

.................................न्या.

(सुधांशु धुलिया)

..................................न्या.

(जे.बी. पारडीवाला)

नवी दिल्ली ;

२९ मार्च, २०२३.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x-x-x-x